MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
दिशा

वर्ष पंचविसावे / अंक ४ / एप्रिल २०२४

# संपादकीय

## एका विज्ञान प्रसारकाची जन्मशताब्दी

विज्ञान सर्वव्यापी आहे. निसर्गातील घटना विज्ञानाचे नियम पाळूनच घडत असतात. या नियमांची उकल करण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करीत असतात. त्यातून नवनवीन संकल्पना, तत्त्वे आणि सूत्रे तयार होत असतात. त्यातील काही सोपे, तर काही कठीण असतात. विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला त्यांचे आकलन सहज होते. परंतु ज्यांनी विज्ञानाचा पद्धतशीर अभ्यास केला नाही किंवा ज्यांनी आपले शिक्षण अर्धवट सोडले अशा व्यक्तींना वैज्ञानिक सत्ये स्पष्ट करून सांगावे लागतात. हे काम विज्ञान प्रसारक करतात. अशाच एका विज्ञान प्रसारकाची जन्मशताब्दी या वर्षी साजरी करण्यात येत आहे. त्यांचे नाव प्राध्यापक रामचंद्र विठ्ठल सोवनी. ते रा. वि. सोवनी या नावाने ओळखले जायचे.

रामचंद्र सोवनी यांचा जन्म ३० एप्रिल १९२४ रोजी पुण्यात झाला. त्यांनी आपले शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यातच घेतले. रमणबागेतील न्यू इंग्लिश स्कूल मधून १९४० मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी फर्ग्युसन आणि सर परशुराम भाऊ महाविद्यालयातून केले. १९५२ मध्ये त्यांनी पुणे विद्यापीठाची प्राणिशास्त्र या विषयात विज्ञान पारंगत (एम. एससी.) ही पदवी मिळवली. त्यानंतर लगेच ते मुंबईच्या रुपारेल महाविद्यालयात व्याख्याते म्हणून रुजू झाले. या महाविद्यालयात ते १९७४ पर्यंत जीवशास्त्र शिकवित असत. विद्यार्थ्यांमध्ये ते फारच लोकप्रिय होते. जीवशास्त्रातील गुंतागुंतीच्या संकल्पना ते लिलया समजावून देत असत. शिकवण्याबरोबरच विज्ञान प्रसाराकडे त्यांनी लक्ष दिले. १९६६ मध्ये मराठी भाषेत विज्ञान प्रसार करण्यासाठी 'मराठी विज्ञान परिषदे'ची स्थापना करण्यात आली. ते आपसूकच या संस्थेशी जोडले गेले. काही काळ ते या परिषदेचे उपाध्यक्ष होते. त्याचबरोबर काही वर्षे ते विज्ञान परिषदेच्या अंकाचे संपादक म्हणून काम करीत होते. मराठी विज्ञान परिषदेने 'विज्ञान परिभाषा कोष' प्रकाशित केला. त्याचे संपादन देखील सोवनी सरांनीच केले होते.

१९७६ ते १९८४ या कालावधीत मला प्राध्यापक सोवनी यांना जवळून पाहता आले. १९७६ मध्ये मी जेव्हा 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात' गेलो तेव्हा ते त्या केंद्रातील सर्वांत वयस्कर वैज्ञानिक होते. विज्ञानात मूलभूत

(मुखपृष्ठ क्र. २ वर)


(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

संशोधन करण्यासाठी १९४५ मध्ये टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. याच संस्थेत विज्ञान आणि गणित अध्यापनात संशोधन करण्यासाठी १९७४ मध्ये 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राची' स्थापना करण्यात आली. या संस्थेत काम करण्यासाठी केंद्र प्रमुख प्राध्यापक वि. गो. कुलकर्णी यांनी सोवनी सरांना पाचारण केले. मी जेव्हा त्यांना पहिल्या वेळेस भेटलो तेव्हा सर्वांना मदत करणारे आणि सौजन्यशील व्यक्ती अशी त्यांची प्रतिमा माझ्या मनात निर्माण झाली. विशेष म्हणजे हीच त्यांची प्रतिमा शेवटपर्यंत कायम राहिली. जीवशास्त्रात काहीही अडचण आली की मी त्यांच्याकडे जात असे. मला विद्यार्थीदशेत भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र जेवढे आवडायचे, तेवढे जीवशास्त्र आवडायचे नाही. सोवनी सरांच्या संपर्कात आल्यावर मला हे शास्त्र देखील आवडू लागले. याच बळावर मी 'सूक्ष्मदर्शक आणि जीवशास्त्रातील प्रयोग' या विषयावर पुस्तके लिहिण्याचे धाडस करू शकलो.

प्रा. रा. वि. सोवनी यांनी विज्ञान प्रसाराचे व्रतच घेतले होते. व्याख्यान, लेखन, प्रश्नोत्तरे आणि प्रयोग-दिग्दर्शन या चार मार्गांनी ते सर्व लोकांपर्यंत विज्ञान पोहोचविण्याचा प्रयत्न करीत असत. वैज्ञानिक विषयावर मराठीत बोलताना तांत्रिक शब्दांची अनेकांना अडचण येते. सोवनी सरांना मात्र अशी अडचण कधीच जाणवली नाही. त्यामुळे त्यांच्या व्याख्यानांना सतत गर्दी होत असे. मुंबई आकाशवाणीवर त्यांनी अनेक व्याख्याने दिली. आपल्या व्याख्यानातून वैज्ञानिक दृष्टिकोन कसा स्पष्ट होईल यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे त्यांची व्याख्याने वेगवेगळ्या स्तरांतील प्रेक्षकांना आवडत असत. व्याख्यान देण्याबरोबरच लेखन करण्यात त्यांचा हातखंडा होता. ते विविध विषयांवर लेखन करीत असत. त्यांचे अनेक लेख वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी 'मराठा' या वर्तमानपत्रासाठी लेखन केले. तसेच 'किर्लोस्कर' मासिकासाठी लेख लिहिले. मराठी विज्ञान परिषदेच्या 'विज्ञान पत्रिकेत' ते नियमितपणे लिहीत असत. याखेरीज पुस्तक लेखनाकडे देखील त्यांनी पुरेसे लक्ष दिले. १९६२ ला मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले. विज्ञान जगताच्या दृष्टीने ती फार मोठी घटना होती. सामान्य माणसाला त्या घटनेमागील वैज्ञानिक तत्त्व समजावून देण्याच्या उद्देशाने त्यांनी 'चंद्रावर स्वारी' हे पुस्तक लिहिले. ते फारच लोकप्रिय झाले.

त्यांना प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विज्ञान प्रसार करणे आवडत असे. मराठी विज्ञान परिषद महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वैज्ञानिक प्रश्नोत्तराचे कार्यक्रम आयोजित करते. त्यात सोवनी सर अग्रभागी असत. होमी भाभा विज्ञान केंद्राच्या 'किशोर' मासिकात 'शंका समाधान' हे सदर चालविले जात असे. या सदरासाठी त्यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे लिहिली. जेव्हा प्रेक्षकांना समोरासमोर भेटणे शक्य नसे तेव्हा ते आकाशवाणी आणि दूरदर्शन यांच्या माध्यमांतून ते श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. १९७० च्या दशकात मुंबई आकाशवाणीत विज्ञान विभाग सुरू झाला. या विभागाच्या वतीने विज्ञान विषयक कार्यक्रम तयार करून मुंबई आकाशवाणी केंद्रावरून ते प्रसारित केले जात असत. या कार्यक्रमासाठी संहिता लेखक, विज्ञान तज्ज्ञ, व्याख्याते अशा अनेक रूपांत सोवनी सरांनी आपली भूमिका यशस्वीपणे बजावली आहे. १९८० च्या दशकात दूरचित्रवाणीचे प्रसारण चांगलेच स्थिरावले. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ प्राध्यापक जयंत नारळीकर यांना घेऊन 'आकाशाशी जडले नाते' हा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक सोवनी

(पृष्ठ क्र. २२ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष पंचविसावे/अंक ४/एप्रिल २०२४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) म्यानमारमधील Sittwe (सित्वे) बंदर सांभाळायची जबाबदारी भारताकडे | संतोष कारखानीस | २ |
| ३) ऋतू कवितेचे - सजण दारी उभा (भाग २) | श्रीपाद जोशी | ३ |
| ४) स्वातंत्र्यवीर सावरकर - एक ध्रुवतारा | शेफाली वैद्य | ६ |
| ५) प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टी | नरेंद्र गोळे | ८ |
| ६) घनपाठी दत्तात्रय पांडुरंग नवाथे : एक कृतार्थ जीवन | कृपासिंधू दत्तात्रय शिष्य- विनायक मोहनराव गरुड | १४ |
| ७) संगीतायन - नांदी : लेख २ | डॉ. कीर्ती आगाशे | १७ |
| ८) 'सुधारित नागरिकत्व कायद्या'चा संशोधनपूर्ण दस्तऐवज! | विजय कुलकर्णी | १९ |
| ९) ३१ जानेवारी १९४८- छत्रपती शिवाजी आणि संभाजी महाराजांचे स्वप्न साकार | संकेत कुलकर्णी | २१ |
| १०) परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# म्यानमारमधील Sittwe (सित्वे) बंदर सांभाळायची जबाबदारी भारताकडे

*नुकतीच म्यानमारमधील Sittwe (सित्वे) बंदरात व्यवहार सांभाळायची जबाबदारी भारताला मिळाली आहे. यापूर्वी भारताला इराणच्या छाबहारबंदरात व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी सोपवली गेली होती. हे भारताकडे आलेले दुसरे बंदर आहे. ही गोष्ट आपल्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. यावर प्रकाश टाकणारा लेख – संपादक*

म्यानमारमध्ये सध्या यादवी युद्ध चालू आहे. तेथे चीन घुसण्याचा प्रयत्न करीत आहे. गेली पंधरा वर्षे आपण हे बंदर विकसित करीत होतो. आपल्या पूर्वोत्तर (ईशान्य) राज्यांना भारताशी जोडण्यासाठी चांगला खुष्कीचा मार्ग उपलब्ध नाही. तेथे संपूर्ण डोंगराळ प्रदेश असल्याने मार्ग बनविणे कठीण आहे. तसेच, तेथे जाण्यासाठी केवळ बांगला देशाच्या उत्तरेला असलेली चिंचोळी पट्टी (सिलगुडी कॉरिडॉर) उपलब्ध आहे. चीन या पट्टीवर नियंत्रण ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. तसेच, तेथे जाण्यासाठी वळसा घालून जावे लागते. यामुळे तेथे मालवाहतूक करणे कठीण आहे. आपल्या सीमेजवळचे बंदर मिळाल्याने आपल्याला या बंदराचा वापर करता येईल. तसेच, म्यानमारलाही या बंदराचा वापर करता येणार असल्याने त्यांचाही अन्य देशांशी व्यापार सुलभ होईल. आपले म्यानमाराशी असलेले संबंध अधिक घट्ट होतील. आपल्या आसपासच्या देशांना कह्यात घेऊन भारताला विळखा घालण्याच्या चीनच्या प्रयत्नांना खीळ बसेल.

हा प्रकल्प कालदान मल्टीमॉडेल प्रोजेक्टचा एक भाग आहे. म्यानमारमधून कालदान नदी वाहते. त्यावरून त्या प्रोजेक्ट्चे हे नाव ठेवले गेले आहे. २००८ साली या प्रोजेक्ट्च्या अग्रीमेंटवर सह्या झाल्या आहेत. आपण या प्रोजेक्टसाठी खूप पैसे खर्च केले आहेत. त्या देशातील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे हा प्रकल्प पूर्ण होण्यास खूप वेळ लागला.

प. बंगालच्या हुबळी बंदरातून बोटीने निघालेला माल म्यानमारच्या सित्वे बंदरातून कालदान नदीच्या मार्गाने म्यानमारच्या लॅशीओपर्यंत येईल. नंतर रस्त्याने हा माल मिझोरामपर्यंत येईल. यामुळे कलकत्ता ते मिझोरामपर्यंतचे अंतर सुमारे १,३२८ किलोमीटर्सने कमी होईल आणि माल पोचण्यासाठी तीन ते चार दिवस (सुमारे ५०%) कमी लागतील. सध्याच्या युगात सप्लाय चेन मॅनेजमेन्टला खूप महत्त्व आले आहे. त्या दृष्टीने हा ३-४ दिवस कमी लागणारा वेळ महत्त्वाचा आहे.

हा मार्ग असा असणार आहे:-

1 Kolkata-Sittwe shipping route - 539 km (335 mi)

2 Sittwe seaport to Paletwa inland jettyriver boat route - 158 km (98 mi)

3 Paletwa inland jetty to Zorinpui road route in Myanmar - 62 km (39 mi)

4 Zorinpui to -izawl road route in India - 110 km (68 mi)

या मार्गाला समांतर असा दुसरा रेल्वेमार्गही बनविण्याचा आपला विचार आहे.

आपल्या ईशान्य राज्यांना अन्य भूमीशी जोडण्यासाठी आणि आजवर दुर्लक्षित राहिलेल्या या प्रदेशाच्या विकासासाठी हा मार्ग वरदान ठरणार आहे.

**– संतोष कारखानीस**

ठाणे

•••

यशाचे मधूर चांदणे हवे असेल तर प्रयत्नांची चंद्रमा अखंड तेवत ठेवली पाहिजे...

# ऋतू कवितेचे - सजण दारी उभा
## (भाग २)

*सुरेश भट हे मराठीतील एक ख्यातनाम कवी होऊन गेले. 'गझल' हा काव्यप्रकार त्यांनी उच्चपदावर नेऊन ठेवला. सर्व मराठी रचनाकारांना त्यांनी वेडं केलं. गझलप्रमाणेच काही मोजकीच भावगीत रचना देखील फार प्रसिद्धीला नेऊन ठेवली. त्यापैकी एका रचनेचा आस्वाद...- संपादक*

रसिक श्रोतेहो नमस्कार. 'ऋतू कवितेचे' या कवितेच्या कार्यक्रमात तुम्हा सगळ्यांचं खूप स्वागत. आज आपण सुरेश भट यांनी लिहिलेली एक अत्यन्त तरल, हृदयस्पर्शी रचना वाचणार आहोत. ही रचना वाचल्यानंतर त्यातल्या ओळींच्या भावार्थाच्या अनुषंगाने आपण अर्थाचे काही पदर उलगडता येतात का, याचा देखील प्रयत्न करणार आहोत. एप्रिल महिन्याच्या प्रचंड उकाड्यात जिथे कुठे बसून तुम्ही ही रचना ऐकणार असाल; एक गोष्ट खात्रीने सांगतो की, तुम्हाला ह्या कडक उन्हातही एक वाऱ्याची मंद झुळूक अनुभवल्याचा साक्षात्कार ही रचना ऐकल्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. कारण ही कविताच इतकी सुंदर आहे. आणखी छान गोष्ट म्हणजे ही नुसतीच कविता नाही, तर ते एक प्रसिद्ध गीत देखील आहे. सुरेश भटांनी लिहिलेल्या या कवितेला संगीत दिलं आहे यशवंत देव यांनी. प्रसिद्ध संगीतकार सलील कुलकर्णी यांनी सुद्धा या कवितेला चाल दिली आहे. 'दिवा लागू दे रे देवा' या अल्बमसाठी सलील कुलकर्णी यांनी या कवितेचं गाणं केलं. हे गाणं गायलं आहे आर्या आंबेकर हिने. वेळ मिळेल तसं डोळे मिटून शांत निवांत ठिकाणी तुम्ही हे गाणं नक्की ऐका. चला तर मग, आता वाचू या कविता : सजण दारी उभा.

**सजण दारी उभा, काय आता करू?**
**घर कधी आवरू? मज कधी सावरू?**

**मी न केली सखे अजून वेणीफणी**
**मी न पुरते मला निरखिले दर्पणी**
**अन् सडाही न मी टाकिला अंगणी**
**राहिले नाहणे! कुठुन काजळ भरू?**
**सजण दारी उभा, काय आता करू?**
**घर कधी आवरू? मज कधी सावरू?**

**मीन दुबळी कुडी अजून शृंगारिली**
**मी न सगळीच ही आसवे माळिली**
**प्राणपूजा न मी अजूनही बांधिली**
**काय दारातुनी परत मागे फिरू?**
**सजण दारी उभा, काय आता करू?**
**घर कधी आवरू? मज कधी सावरू?**

**बघ पुन्हा वाजली थाप दारावरी**
**हीच मी ऐकिली जन्मजन्मांतरी**
**तीच मी राधिका! तोच हा श्रीहरी!**
**हृदय माझे कसे मीच हृदयी धरू?**
**सजण दारी उभा, काय आता करू?**
**घर कधी आवरू? मज कधी सावरू?**

आयुष्यात अनेक ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यात एक चांगली गोष्ट म्हणजे - अनपेक्षित काहीतरी चांगलं घडणे. तुम्हाला जेव्हा हे असं घडणार आहे हे माहीत असतं तेव्हा त्याचं फारसं अप्रूप रहात नाही. पण तुमच्या मनी-ध्यानी नसताना काही चांगलं घडलं तर तुम्ही आनंदून जात हसू लागता, बागडू लागता, हुर्रे म्हणत, टाळ्या देत, नाचत गात आनंद व्यक्त करता. तुमच्या आनंदाला पारावारा उरत नाही. कारण काय तर सरप्रायझिंग एलमेंट. काहीतरी चांगलं सरप्राईज आयुष्य आपल्या पदरात वेळोवेळी टाकत असतं. ते तेव्हा

recognize करणं, सेलेब्रेट करणं, त्यातून आनंद मिळवणं यात सुख आहे.

'सजण दारी उभा' ही एवढी एक फ्रेज जरी वाचली तरी आपल्याला कल्पना येते की, कुणीतरी अनपेक्षितपणे दारी आलं आहे. आता हे कसं लक्षात आलं असेल बरं? 'उभा' हा शब्द त्याचा संकेत आहे. कुणीतरी अचानक दत्त म्हणून जसं उभं राहतं तसं सजन, प्रियकर, जिवलग, सखा दारी उभा राहिला आहे. आणि मग असं अचानक जीवाचं जिवलग दारी उभं राहिल्यावर काय होणार आहे हो! गडबड होणार आहे. तारांबळ उडणार आहे. फजिती होणार आहे. आठवून बघा तुमच्या आयुष्यातले प्रसंग. आगंतुक पाहुणे येतात आणि आपली तारांबळ उडते. त्यांना बघून आपल्याला एकीकडे आनंद झालेला असतो आणि दुसरीकडे आपण त्यांना 'या या, बसा, कसं येणं केलंत' म्हणत त्याचं स्वागत करायला सज्ज होतो. कुणी पाहुण्यांसाठी पाणी घेऊन येतं, कुणी घरात नीट आवरलेलं नसेल तर गोष्टी जागच्या जागी ठेवत नीटनेटकेपण आणायचा प्रयत्न करतं. लगेच चहा येतो. त्या काही मिनिटांत अनेक गोष्टी घडत असतात. आणि मग आपण पाहुण्यांशी डोळ्यांत डोळे घालून आनंदाने बोलायला सुरुवात करतो. आता इथे कवितेत पाहुणे आलेले नाहीत. मग कोण आलं आहे? 'सजण' आला आहे. सखा आला आहे. जिवलग, प्राणप्रिय असं कुणीतरी दारावर येऊन ठेपलं आहे. आणि पर्यायाने काय झालं आहे... तर तिची आता तारांबळ उडाली आहे. **'काय आता करू?'** म्हणजे हे करू की ते करू? त्याला 'आत ये' म्हणू. त्याला पाणी देऊ, त्याला बघत बसू, की मी आणखी काही करू?

तिची ही जी धांदल उडाली आहे ती का उडाली आहे, कारण तो येईल याची तिला पुसटशीही कल्पना नव्हती. जर असती तर तिने सगळी तयारी करून ठेवली असती. परंतु तो अनपेक्षितपणे समोर येऊन दारी उभा राहिल्याने आता तिची पंचायत झाली आहे आणि तिला प्रश्न पडला आहे, 'घर कधी आवरू? मज कधी सावरू?'

जिवलग जेव्हा समोर येऊन उभा राहतो, तेव्हा भान हरपतं. घर-दार, अंगण, ओसरी, आपण स्वतः इतके सगळे एकरूप होऊन जातो आणि सगळ्यांचा मिळून एक गलका सुरू होतो. धावपळ सुरू होते. मग काय आवरायचं असा प्रश्न पडतो. तिलाही तसाच प्रश्न पडला आहे. त्याच्याकडे नुसतं बघत बसू, की त्याला 'घरात ये' म्हणू? ती कावरीबावरी झाली आहे, कारण तिने स्वतःला सावरलेलं नाहीये.

ह्या घाईगडबडीत ती स्वतःच्याच मनाला म्हणते, 'अगं सखे, मी अजून वेणीफणी सुद्धा केली नाहीये'. काय गंमत असते बघा. कविता कशा आपल्याला मागे घेऊन जातात. वेणीफणी करण्याच्या पद्धतीसुद्धा आता बदलेल्या आहेत. आताचा जमाना अनेक प्रकारच्या हेअरस्टाईलचा आहे. दारात तो उभा असताना त्याच्या समोर उभी असणारी ती बॉबकट असलेली नाहीये. गमतीचा भाग सोडून द्या; पण कविता अशी आपल्याला मागे मागे घेऊन जाते आणि रम्य करते. तर या कवितेतली ती म्हणते आहे की, 'मी अजून वेणीफणी केली नाही? म्हणजे आजच्या भाषेत मी माझा मेकअप अजून केला नाही. 'मी न पुरते मला निरखले दर्पणी...' आता ही आणखी एक शब्दाची गंमत बघा. 'निरखणे' आणि 'बघणे' यात फरक आहे. काय फरक आहे? तर बघण्याच्या क्रियेत छोटा अवधी सामावलेला आहे. 'बघितलं आणि बघून संपलं' बस्स इतकंच काय ते. पण निरखणं खूप वेळ चालतं. इथे खूप मोठा अवधी लागतो. मुली जेव्हा आरशापुढे उभ्या राहतात तेव्हा त्या स्वतःला निरखण्यात इतक्या गुंग होऊन जातात की, त्यांना वेळेचं भान राहत नाही. आणि म्हणून निरखण्यात एक 'नजाकत' आहे. त्यात एक ठहराव आहे. जो कवितेला आणखी सुंदर करतो.

''**अन् सडाही न मी टाकिला अंगणी..**'' मित्रहो, अजूनही गावी काही घरी सडा टाकला जातो. पण शहरातून हद्दपार झालेला 'सडा' खेड्यातून सुद्धा आता हद्दपार होतो आहे. आपण प्रगत होत आहोत, आपली जीवनशैली बदलत चालली आहे. पूर्वी घरं, ओसरी शेणाने सारवली जायची. अंगणात शेणाचा सडा टाकला जायचा. सगळी धूळ खाली बसून जायची आणि त्या शिडकाव्याने गार, शांत आणि प्रसन्न वाटायचं. आता आपण फ्लॅट सिस्टीम स्वीकारली आहे. उंचच उंच इमारतीत कसलं आलं अंगण आणि कसला आला शेणाचा सडा! ते असो; काळ बदलतो तसा समाज बदलत असतो. पण हा बदल होत असताना काही चांगलं हाती लागता लागता काही खूप अमूल्य निसटत राहतं हे मात्रखरं!

भटांच्या कवितेतली 'ती' म्हणतेय की, 'मी सडा रांगोळी तर केली नाहीच, पण माझं अजून नहाणं सुद्धा राहिलं आहे.' 'नाहणे' म्हणजे अंघोळ करणे इतपत उलगडा करून सांगायचे दिवस आजकाल आले आहेत याची मला जाणीव आहे, आणि खंतसुद्धा. असो, पण ही कविता अत्यन्त तरल आहे असं मी सुरुवातीला का म्हणालो ते तुम्हाला कळेल. कारण जितका आशय नाजूक आहे तितकेच नाजूक शब्द या कवितेत आले आहेत. कवितेतल्या तिची इतकी लगबग सुरू झाली आहे की, 'ती म्हणते अंघोळ राहिली आहे माझी, मी डोळ्यात काजळ कुठून भरू?' काजळ भरले डोळे स्त्रीला आणखी सुंदरता प्राप्त करून देतात. तिचं नटूनथटून तयार होणं राहिलं आहे.

तो आला आहे आणि माझं सगळंच आवरायचं राहिलं आहे. अंघोळ राहिली, काजळ राहिलं, त्यासोबत:

**मी न दुबळी कुडी अजून शृंगारिली**
**मी न सगळीच ही आसवे माळिली**

कानातलं आभूषण म्हणजे कुडी ती सुद्धा घातली नाहीये, आणि त्याहून वेगळं भट काय लिहितात बघा: **'मी न सगळीच ही आसवे माळिली..'**

तो समोर आल्याने मला इतका आनंद झाला आहे की, 'हर्षभाराने जी आसवं गळत आहेत ती सुद्धा मी माळली नाहीयेत.' किती सुंदर आहे बघा. इथे आसवांना सुरेश भट दागिन्यांची उपमा देतात. एकेक थेंब तिला मोत्यासारखा वाटतो. तिला तो आभूषण समजून परिधान करावा वाटतो. ही खरी कवितेची ताकद असते. हे खरं अंगावर रोमांच आणणारं एक्स्प्रेशन.

पुढे ती म्हणते की :
**प्राणपूजा न मी अजूनही बांधिली**
**काय दारातुनी परत मागे फिरू?**

तो आल्याने सैरभैर होणं म्हणजे काय हे तुम्हाला कळलंच असेल.

आता कवितेचा क्लायमॅक्स. सुरेश भट दारावर जो कुणी आलेला आहे तो कुणी सर्वसामान्य नसून, तो कोण आहे याचा उलगडा करतात. आणि तो उलगडा तिच्याच करवी समोर येतो. ती म्हणते :

**बघ पुन्हा वाजली थाप दारावरी**
**हीच मी ऐकिली जन्मजन्मांतरी**

**तीच मी राधिका ! तोच हा श्रीहरी!**
**हृदय माझे कसे मीच हृदयी धरू?**
**सजण दारी उभा, काय आता करू?**

आणि मग आपल्याला characters कळतात. तो जो दारावर आला आहे, सजन, जिवलग, सखा तो दुसरा तिसरा कुणी नसून 'श्रीहरी' आहे. भगवंत आहे. कृष्ण आहे.

बघ पुन्हा वाजली थाप दारावरी.. ही ओळ पुन्हा

(पृष्ठ क्र. १३ वर)

# स्वातंत्र्यवीर सावरकर - एक ध्रुवतारा

*नुकताच 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपट सगळीकडे प्रदर्शित झाला. या चित्रपटसंदर्भात ज्येष्ठ लेखिका शेफाली वैद्य यांचा लेख : संपादक*

काल रात्रीपासून अस्वस्थ आहे फार, झोपेतही सतत वीर सावरकर आठवत होते. खरं तर रणदीप हूडाच्या 'स्वातंत्र्यवीर सावरकर' ह्या चित्रपटाविषयी इतकं काही लिहून आलंय की, परीक्षण म्हणून फार काही वेगळं लिहिता येईल असं मला वाटत नाही. हे मुक्त चिंतन आहे, चित्रपटाच्या अनुषंगाने आलेलं.

माझ्या आयुष्यात सावरकर फार लवकर आले. आमच्या घरात सावरकरांची बरीच पुस्तकं होती, त्यातलं 'माझी जन्मठेप' मी नववीत असताना वगैरे वाचलं असेल. तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत एकीकडे तोंडात काजू किंवा आंब्याची साठं चघळत निवांत पुस्तकं वाचायची अशी मला सवय होती. पण 'माझी जन्मठेप' वाचताना इतका त्रास झाला होता की, खाणं-बिणं तर सोडाच; पण कोलूची, एकलकोठडीची वर्णनं वाचताना हमसून हमसून रडले होते मी. बारीची परपीडक वृत्ती तेव्हाही चीड आणणारी होती, पण ह्या सर्व दुःखदायक भावनांना पुरून उरेल अशी सावरकरांची विजिगीषू वृत्ती ही त्या कोवळ्या वयातही प्रेरणा देणारीच होती.

'माझी जन्मठेप' वाचताना माझ्या कल्पनेत मी अंदमानच्या त्या काळकोठडीतल्या नरकयातना ज्या उभ्या केल्या होत्या त्याहून किती वाईट यातना प्रत्यक्षात सावरकरांना भोगाव्या लागल्या होत्या हे काल स्क्रीनवर त्याची एक झलक पाहताना प्रकर्षाने जाणवलं. सारखे सारखे डोळे भरून येत होते, दुःख, चीड, बारी आणि जेलरबद्दलची घृणा आणि सावरकरांबद्दलचा आदर ह्या सर्व भावना एकाच वेळी मनात दाटून येत होत्या आणि परत परत मी स्वतःला बजावत होते की, आपण जे अर्ध्या तासात पडद्यावर बघून संपवतोय ते स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तब्बल दहा वर्षे अंदमान मध्ये भोगले होते. जे हरामखोर आज सावरकरांना 'माफी-वीर' म्हणून हिणवतात त्यांनी एक दिवस अंधारकोठडीत घालवून दाखवावा. सावरकर हे एकमेव राजबंदी असे होते, ज्यांना सहा वेळा अंदमान मध्ये सॉलिटरी मध्ये ठेवले गेले.

चित्रपटात एक प्रसंग दाखवलाय, जेलमधले कुजलेले, सडलेले, निकृष्ट प्रतीचे अन्न इतकी वर्षे खाल्ल्यानंतर शेवटी त्यांची सुटका झाल्यानंतर सावरकर घरचे अन्न यमुनाबाई ताटात वाढताना बघतात तेव्हा ती साधी भाजी-भाकरी पाहून त्यांचा बांध फुटतो. इतक्या अनन्वित छळानंतरही डेव्हिड बारीच्या डोळ्यांत डोळे घालून 'आय आऊटलास्टेड यू बारी' म्हणणारे कणखर सावरकर भावनिक दृष्ट्या क्षणभर विकल होतात ते त्या क्षणी. भारतीय लोकांचा करंटेपणा हा की, ते सावरकरांना सोडून गांधींसारख्या दुबळ्या मनाच्या नेत्याच्या मागे गेले!

ह्या चित्रपटात गांधी पहिल्यांदा जसे होते तसे दाखवले गेलेत. अहंमन्य, अहिंसेचा अतिरेकी कैवार घेणारे, सदैव मुसलमानांचे लांगूलचालन करणारे, काँग्रेसमध्ये आपल्या आणि आपल्या लाडक्या जवाहरशिवाय दुसऱ्या कुणाही नेत्याला मोठे न होऊ देणारे, मातीचे पाय असलेले सामान्य कुवतीचे नेते म्हणून गांधी ह्या चित्रपटातून आपल्या समोर येतात, आणि म्हणूनच 'गांधी इतना बडा हो गया!' ह्या सावरकरांच्या प्रश्नातला उपरोध आपल्याला बोचतो.

चित्रपटात जेव्हा सावरकर विचारतात की, 'ब्रिटिश सरकार तर्फे अंदमान मध्ये काळ्या पाण्याची सजा भोगायला केवळ क्रांतिकारकांनाच का पाठवले गेले? काँग्रेसच्या एकही नेत्याला काळ्या पाण्याची सजा का झाली नाही? एकही काँग्रेसचा नेता फासावर का गेला नाही?' या प्रश्नांना काय उत्तर आहे कोणाकडे?

चित्रपटात जेव्हा कोवळी कोवळी अठरा-वीस वर्षांची मुले हसत हसत फासावर जाताना दिसतात तेव्हा जीव तुटतो. चापेकर बंधू, मदनलाल धिंग्रा, अनंत कान्हेरे, खुदीराम बोस, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव... किती उड्डाण पूल आहेत आज भारतात त्यांच्या नावाने बांधलेले, किती संस्था? किती विमानतळ? किती सरकारी योजना? किती रस्ते? विचारा हा प्रश्न स्वतःलाच!

सावरकर आणि इतर क्रांतिकारी स्वातंत्र्यसैनिक ह्यांच्या नशिबी अंदमानची काळकोठडी आणि गांधीचा 'तुरुंग' म्हणजे पुण्याचा आलिशान 'आगाखान पॅलेस!', असे का? गांधींच्या लाडक्या नेहरूंसाठी नगरच्या किल्ल्यात स्वतंत्र स्वयंपाकी होता, त्यांना दिवसातून दोन तास बॅडमिंटन खेळण्यासाठी खास कोर्ट बनवले होते, नेहरूंना गुलाब आवडतात म्हणून नगरच्या किल्ल्यात खास गुलाबाची बाग जोपासायला ब्रिटिशांनी परवानगी दिली होती! आणि सावरकरांच्या नशिबी? दिवसातून आठ तास कोलूला जुंपून तेल काढणे! तितके तेल निघाले नाही तर पाठ चाबकाने फोडून काढली जायची.

अजूनही मला समजत नाही, वीर सावरकरांबद्दल ह्या देशातल्या काही लोकांच्या मनात इतका पराकोटीचा द्वेष का? त्यांच्या त्यागाचा ना कधी स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकरांनी फायदा करून घेतला, ना त्यांच्या मुला-नातवंडांनी. सत्तेच्या राजकारणापासून सावरकर कुटुंब कायमच ठरवून दूर राहिले.

सावरकर त्यांच्या उत्तरआयुष्यात जातीअंतासाठी आणि हिंदू एकतेसाठी लढले. भारत सरकारकडे ना त्यांनी कधी सरकारी सवलती मागीतल्या, न स्वतंत्र भारताच्या कुठल्या पंतप्रधानाने त्यांना भारतरत्न देऊ केले! उलट स्वतंत्र भारतातही ज्यांना दोनदा कारावास भोगावा लागला असे सावरकर हे एकमेव स्वातंत्र्यसैनिक! ज्या देशासाठी इतके कष्ट सोसले त्या देशाने, तिथल्या राज्यकर्त्यांनी काय दिलं सावरकरांना? सन्मान तर सोडाच, दिल्लीतल्या निर्बुद्ध राष्ट्रीय पप्पू पासून ते महाराष्ट्रातले गल्लीतल्या गटारात वळवळण्याची देखील लायकी नसलेले क्षुद्र शेणकिडे त्यांच्यावर सतत खोटे निरर्गल आरोप करतात, सत्य सर्व बाहेर आलेले असूनही!

सावरकर गेले. त्यांच्या वाट्याला जितके भोग आले ते धीरोदात्तपणे भोगून, शांतपणे, स्वतःच्या अटींवर प्रायोपवेशन करून गेले. सूर्यावर थुंकण्याचा गांडूळांनी कितीही प्रयत्न केला तरी गांडूळ गांडूळच असतं. चिमूटभर मीठ टाकलं तर तडफडतं. पण तरीही इतका आंधळा द्वेष का?

रणदीप हूडाने हा चित्रपट बनवून भारताच्या पुढच्या पिढ्यांवर अनेक उपकार केलेले आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या क्षितिजावर उगवलेला विनायक दामोदर सावरकर हा तेजस्वी ध्रुवतारा हा होता तरी कसा हे पुढच्या पिढ्यांना बघता तरी येईल. चित्रपटात रणदीप हूडा कुठेच दिसत नाही, दिसतात फक्त सावरकर, पडदा दशांगुळे व्यापून वर पुरून उरलेले. चित्रपट पाहिला नसेल तर नक्की बघा, तुमच्याबरोबर इतरही लोकांना घेऊन जा. स्वातंत्र्यवीर सावरकर हा केवळ एक चरित्रपट नाही, तो स्वतंत्र भारताचा खरा इतिहास आहे, आजवर तुम्हाला कोणीही न सांगितलेला!

**– शेफाली वैद्य**
ज्येष्ठ लेखिका
पुणे

---

आयुष्यातल्या कोणत्याही क्षणी क्रोधाचे गुलाम बनू नका...

# प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टी

*आंतरराष्ट्रीय स्तरावर अणुभट्टी हा विजय अत्यावश्यक आहे. सामान्यांना त्याची अजूनही फारशी आवश्यकता माहीत नाही, हे एक सत्य आहे. केवळ युद्धाकरिता नव्हे, तर मानव कल्याणाकरिता याचा उपयोग फार मोठा आहे. आजच्या पंतप्रधानांना हे महत्त्वाचे वाटते. या विषयाच्या संदर्भात काहीशी टेक्निकल परंतु आवश्यक माहिती या लेखाद्वारे वाचा.– संपादक*

४ मार्च २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी, भारताच्या तीन टप्प्यांच्या अणुकार्यक्रमातील, दुसऱ्या टप्प्यातील ऐतिहासिक प्रवेश, कळपक्कम येथील ५०० मेगावॉट विद्युत क्षमतेच्या, प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीच्या १ गर्भातील इंधनभरण्यास सुरुवात होतांना स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून अनुभवला. मग पंतप्रधानांनी अणुभट्टीच्या गर्भगृहास (रिऍक्टर व्हॉल्ट), तसेच नियंत्रण कक्षासही भेट दिली. तेव्हा पंतप्रधानांना, अणुभट्टीच्या कळीच्या वैशिष्ट्यांबाबत अवगत करण्यात आले. या प्रकारची ही पहिलीच अणुभट्टी असल्याने तिला 'प्रारूप' म्हणजे 'पथदर्शी' असे म्हटलेले आहे. शीघ्रगती विरक्तकांवर (फास्ट न्यूट्रॉन्स वर) ती चालत असल्याने तिला 'शीघ्र' म्हणतात. मात्र ती जेवढे इंधन खर्च करते, त्याहून जास्त इंधनाची निर्मितीही ती त्याचवेळी करत असते, त्यामुळे तिला 'प्रजनक' अणुभट्टी असे म्हटले जाते.



या प्रकाशचित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी इंधनभरणास सुरूवात करतांना दिसत आहेत. सोबतच (उजवीकडून डावीकडे) अणुऊर्जा आयोगाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. अजितकुमार मोहंती, भारताचे सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक श्री. विवेक भसीन आणि भाविनीचे अध्यक्ष श्री. के. व्ही. सुरेशकुमार हेही दिसत आहेत.

इंधनभरणा पूर्ण होताच अणुभट्टीची क्रांतिकतेकडे पहिली वाटचालही सुरू होईल. मग यथावकाश विद्युतनिर्मितीही सुरू होईल. 'आत्मनिर्भर भारत' धोरणानुसार ही अणुभट्टी, भारतीय अणु–विद्युत निगम मर्यादित (भाविनी - BHAVINI-Bharatiya Nabhikiya Vidyuta Nigam) ही नोंदीत पेढी निर्माण करत आहे. पूर्णतः स्वदेशी बनावटीची संकल्पना करून, तशीच ती घडवलेली आहे. भारतातील २०० हून अधिक मध्यम व लहान उद्योगांचाही या कार्यात सहभाग राहिलेला आहे. भारताचा अणुकार्यक्रम अशा उद्देशाने तयार केलेला आहे की, दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा साध्य व्हावी आणि त्याच वेळी शाश्वत विकासही व्हावा.

भारताने संपूर्ण अणुइंधनचक्रावरील सर्वंकश सामर्थ्ये प्राप्त करून घेतलेली आहेत. सरकारने २००३ साली 'भाविनी'स भारताची सर्वात प्रगत अशी प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टी उभारण्यास, तसेच चालवण्यास संमती दिली. ही कार्यान्वित होईल तेव्हा, रशियानंतर भारत हा दुसरा असा देश ठरेल, ज्याने शीघ्र प्रजनक अणुभट्टी व्यापारी स्तरावर सुरू केलेली आहे.

आपल्या देशात युरेनियम साठे मर्यादित आहेत आणि थोरियम साठे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यांच्यापासून दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा प्राप्त करणे गरजेचे आहे. भारताने त्यासाठी तीन टप्प्यांचा अणुकार्यक्रम अवलंबलेला आहे. त्याचा उद्देश देशातील आण्विक

स्रोतांचा इष्टतम वापर करण्याचा आहे. हा कार्यक्रम क्रमवार आहे. प्रत्येक टप्प्याकरता इंधनक्रम योजलेले आहेत. वापरलेल्या इंधनाचे पुनर्प्रक्रियण करून पुढील टप्प्यातील इंधन मिळवता येत असते. हे तीन टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

१. नैसर्गिक युरेनियम इंधनावर चालणाऱ्या, दाबित जड पाणी अणुभट्ट्या,

२. प्लुटोनियम इंधनावर चालणाऱ्या, शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या आणि

३. थोरियम-युरेनियम चक्रात, युरेनियम-२३३ इंधनावर चालणाऱ्या, प्रगत अणुभट्ट्या.

पहिल्या टप्प्यातील दाबित जड पाणी अणुभट्ट्यांचा कार्यक्रम, भारतीय अणुऊर्जा महामंडळ मर्यादित (एन.पी.सी.आय.एल. ANPCIL - Nuclear Power Corporation of India Limited) ही नोंदीत पेढी चालवत आहे. दुसऱ्या टप्प्यातील शीघ्र प्रजनक अणुभट्ट्यांचा कार्यक्रम 'भाविनी' पुढे नेत आहे.

भाविनी ही भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणातील नोंदीत पेढी आहे. तिचा उद्देश तमिळनाडूतील कळपक्कम येथे, पहिली ५०० मेगावॉट विद्युत क्षमतेची शीघ्र प्रजनक अणुभट्टी उभारणे आणि तिचे कार्यान्वयन करण्याचे आहे. त्यानंतर देशाला दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा पुरवण्याकरता भारत सरकारच्या अणुऊर्जा कार्यक्रमाखाली, विद्युत निर्मितीकरता भावी प्रजनक अणुभट्ट्यांची उभारणी, कार्यान्वयन, संचालन व देखभाल यांची जबाबदारीही भाविनीस दिलेली आहे.

भारतीय नाभिकीय विद्युत निगम लिमिटेड
Bharatiya Nabhikiya Vidyut Nigam Limited

### प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टी

प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीची उभारणी स्वावलंबी पद्धतीने स्वदेशीच करण्यात आलेली आहे. त्यात प्रमुख भारतीय उद्यमांना समाविष्ट करून घेण्यात आलेले आहे. देशाच्या 'आत्मनिर्भर'तेच्या धोरणानुसार केलेल्या उभारणीमुळे भट्टीचे शाश्वत संचालन करता आल्यास देशाच्या यशोमुकुटात नवेच पीस खोवले जाईल. कळपक्कम येथेच लगतच्या आवारात आणखीही शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या उभारण्याच्या भाविनीच्या योजनेस यामुळे गती लाभेल. भविष्यात इतर संभाव्य स्थानांवरही अशा भट्ट्या उभारल्या जाऊ शकतील.


अणुऊर्जासंयंत्रात दोन वेगळे भाग असतात. पहिला भाग आण्विक प्रक्रियांचा असतो. तो ज्या जागेत कार्यरत असतो त्या जागेस 'अणुद्वीप' म्हणतात. दुसरा भाग सर्वसामान्य विद्युत ऊर्जा हाताळणारा भाग असतो. तो ज्या जागेत कार्यरत असतो त्या जागेस 'ऊर्जाद्वीप' म्हणतात. ऊर्जाद्विपावरील सर्व भट्ट्यांची उभारणी आणि सर्व प्रणालींच्या आपापसातील समन्वयाचे काम पूर्ण झालेले आहे. सर्व इंधन हाताळणी प्रणाली कार्यान्वित झालेल्या आहेत आणि एकात्मिक पडताळणी प्रगतीपथावर आहे.

अणुद्वीप आणि ऊर्जाद्वीप या दोन्हीही द्विपांतील सर्व प्रणालींची उभारणी आणि एकात्मिकरण (इंटिग्रेशन) संपल्यावर, प्रत्येक सुट्या प्रणालीचे समस्वरणही (ट्युनिंग) साधले गेलेले आहे. सर्व इंधन हाताळणी प्रणाली कार्यान्वित केल्या गेलेल्या आहेत आणि त्यांची एकात्मिक पडताळणी प्रगतीपथावर आहे.

शीघ्र प्रजनक अणुभट्टी प्रकाराची ही सुरुवात आहे. भावी काळात ६०० मेगावॉट क्षमतेच्या आणखी २ शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या, प्रारूप अणुभट्टीलगतच कळपक्कम येथे उभारल्या जाणार आहेत. त्या देशास दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा पुरवतील अशी अपेक्षा आहे. कळपक्कम येथील इंदिरा गांधी अणुऊर्जा संशोधनकेंद्रात (सेंटर फॉर ऍटॉमिक रिसर्च) विकसित केलेल्या

अभिकल्पन आणि तंत्रज्ञानाचे आधारे ही प्रारूप अणुभट्टी उभारली जात आहे.

अणुभट्टी कक्ष म्हणजे मजबूत सांधकाची (सिमेंटची) दंडगोलाकार खोली असते. कक्षात भिंतीला चिकटूनच सर्व आकारमान व्यापणारे सुरक्षा भांडे बसवलेले असते. त्याच्या आतल्या बाजूस अंतर्गत भांडे बसवलेले असते. त्याच्या आत गाभारा असतो. दंडगोलाकार गाभाऱ्याच्या तळाशी सारणीचे तबक बसवलेले असते. त्यातून निरनिराळे उपस्कर गाभाऱ्याबाहेर येत असतात. गाभाऱ्यात द्रव सोडियम (तापमान किमान ४००ओसे) भरलेला असतो. राखाडी रंगाचे इंधनदंड ऊर्जानिर्मितीस कारण ठरतात. त्यातील निर्माण झालेली उष्णता खालून वर वाहणारे द्रव सोडियमचे प्रवाह वर घेऊन जात असतात. हे सोडियम किरणोत्सारी असल्याने त्यातील उष्णता, माध्यमिक उष्णता विनिमयकात, द्वितीयक सोडियमला दिली जाते. द्वितीयक सोडियम ती पाण्याला देतो. त्या पाण्याची वाफ होते. ती दाबित असल्याने तिचे तापमानही ३००ओसे पर्यंत राहते. या उच्चदाब वाफेने वाफचक्की चालवली जाते. मग वाफचक्की विद्युतजनित्र चालवून वीज निर्माण करते. हीच वीज पुढे राष्ट्रीय विद्युत जालास जोडून ग्राहकापर्यंत पोहोचवली जाते. वाफचक्कीतून बाहेर पडणारी वाफ निववण्याचे कार्य संघनक करत असतो. त्यात समुद्राचे पाणी शीतक म्हणून वापरले जाते.



प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीची संरचना समजून घेण्याकरता वरील आकृती काळजीपूर्वक पाहा. त्यात दिलेले आकडे, लगतच्या उपस्करांची नावे देण्याकरता पुढे उपयोगात आणलेले आहेत.

| अक्र | विवरण (इंग्रजी) | मराठी अर्थ |
|---|---|---|
| १ | मेन व्हेसल | मुख्य भांडे |
| २ | कोअर सपोर्ट स्ट्रक्चर | गाभारा आधार संरचना |
| ३ | कोअर कॅचर | गाभाऱ्याचे अवशेष संकलक |
| ४ | ग्रिड प्लेट | सारणीचे तबक |
| ५ | कोअर | गाभारा |
| ६ | इन्नर व्हेसल | आतील भांडे |
| ७ | रूफ स्लॅब | छताचा ओतीव पत्थर |
| ८ | लार्ज रोटेटेबल प्लग | मोठे फिरकीचे झाकण |
| ९ | स्मॉल रोटेटेबल प्लग | छोटे फिरकीचे झाकण |
| १० | कंट्रोल प्लग | नियंत्रक झाकण |
| ११ | कंट्रोल अँड सेफ्टी रॉड मेकॅनिझम | नियंत्रण आणि सुरक्षा दंड यंत्रणा |
| १२ | इन व्हेसल ट्रान्सफर मशीन | भांड्यांतर्गत अंतरण यंत्र |
| १३ | इंटरमेडिएट हीट एक्स्चेंजर | माध्यमिक उष्णता विनिमयक |
| १४ | प्रायमरी सोडियम पंप | प्राथमिक सोडियम उत्क्षेपक |
| १५ | सेफ्टी व्हेसल | सुरक्षा झडप |
| १६ | रिऍक्टर व्हाल्ट | अणुभट्टी कक्ष |

खरं आणि खोटं यात केवळ चार बोटांचं अंतर आहे.
आपण कानांनी ऐकतो ते खोटं आणि डोळ्यांनी पाहतो ते खरं!

शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या, प्ल्युटोनियम आणि (दाबित जड पाणी अणुभट्ट्या तसेच शीघ्र प्रजनक अणुभट्ट्यांतून) आधीच वापरलेल्या युरेनियम इंधनातून पुनर्प्राप्त केलेले युरेनियम, पूर्णचक्र (क्लोज्ड लूप) प्रक्रियेत ऊर्जास्रोत म्हणून वापरतील. त्या शीघ्र विरक्तक पल्ल्यावर (फास्ट न्यूट्रॉन रेंज वर) काम करतात.

अणुविदलनामुळे भट्टीत निर्माण झालेली ऊर्जा, दोन सोडियम उत्क्षेपकांद्वारे भट्टीतून द्रव सोडियम फिरवून, बाहेर काढून घेतली जाते. प्रवेशी सोडियमचे तापमान ३९७ओसे असते तर निवेशी सोडियमचे तापमान ५४७ओसे असते. तप्त सोडियम किरणोत्सारी असतो म्हणून तो थेट वाफनिर्मितीकरता वापरला जात नाही. त्याऐवजी तो, द्वितीयक सोडियमला, चार उष्णता विनिमयकांत, ऊर्जा अंतरित करतो. किरणोत्सारी नसलेला द्वितीयक सोडियम, २ स्वतंत्र द्वितीयक मंडलांतून उत्क्षेपकांद्वारे फिरवला जाऊन, चार वाफनिर्मकांद्वारे, वाफनिर्मिती करतो. या वाफेने वाफचक्की फिरवली जाते. वाफचक्कीने विद्युतजनित्र फिरते आणि वीज निर्माण होत असते. संयंत्राबाहेरील विद्युतजाळे बंद पडल्यास किंवा वाफ-पाणी-प्रणाली उपलब्ध नसल्यास; ऱ्हास-उष्मा (डिके-हीट) अकर्मक सुरक्षा दर्जाच्या ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणालीद्वारे (पॅसिव्ह सेफ्टी ग्रेड डिके हीट रिमूव्हल सिस्टिम) भट्टीतील उष्णता काढून घेतली जाते. ही उष्मानिष्कासन प्रणाली ८ मेगावॉट औष्णिक क्षमतेच्या चार स्वतंत्र मंडलांतून उष्णता बाहेर काढत असते. या मंडलांत सोडियम आणि हवा नैसर्गिक अभिसरणाने फिरत राहतात.

**प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीची कळीची वैशिष्ट्ये**

| क्षमता औष्णिक | क्षमता विद्युत | शीतक | कार्य-क्षमता औष्णिक | संकल्पना | इंधन | प्राथमिक उत्क्षेपक सोडियम | उष्मा विनिमयक माध्यमिक | द्वितीयक मंडले | मंडला-गणिक वाफ-निर्मक | वाफ चक्की | कल्पित आयुष्य वर्षे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२५० मेवॉ | ५०० मेवॉ | सोडियम | ४०% | तलाव | $PuO_2 + UO_2$ | २ | ४ | २ | ४ | १ | ४० |

प्रारूप अणुभट्टीत, उच्च औष्णिक वहनक्षमतेमुळेच सोडियमचा शीतक म्हणून उपयोग केला जातो. सोडियमचे स्वल्प विरक्तक विमंदन (न्यूट्रॉन मॉडरेशन) आणि इंधन व संरचनात्मक पदार्थांसोबतची सुसंगतीही त्यास पूरक ठरते. तलाव संकल्पनेतील अंगभूत कल्पना, मुख्य भांड्यास कमीतकमी छेद घेण्याकरता सोयीची ठरते.अणुभट्टी बंद केल्यावरही अणुप्रक्रिया ताबडतोब थांबत नाहीत. किरणोत्सारी पदार्थांच्या अविरत ऱ्हासापायी उष्णता उत्सर्जन सुरूच राहते. त्यामुळे अणुभट्टी बंद केल्यावरही जी उष्णता भट्टीतून काढून घ्यावीच लागत असते त्याकरता ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणाली आवश्यक असतात. त्या नसल्यास उष्णता अतोनात वाढून गर्भ तापमान धोकादायक पातळी गाठू शकते. ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणाली सर्व परिस्थितीत निरंतर गर्भशीतन सुरक्षित करते.

पूर्वतयारी पूर्ण होताच आणि नियामक अनुमती प्राप्त होताच १० ऑगस्ट २०२३ रोजी मुख्य भांड्यात सोडियम भरणा यशस्वीरित्या सुरू करण्यात आला होता. १५ ऑगस्ट २०२३ रोजी पहाटेसच तो पूर्णही झाला.

---

आपण चंदन असल्याची घोषणा चंदनाला कधीच करावी लागत नाही;
त्याचा गंध वाऱ्याबरोबर आपोआप पसरत जातो!

पूर्वतापन आणि भरणप्रक्रियेदरम्यानच्या सर्व क्रिया शल्यक्रियात्मक नेमकेपणाने, सर्व सुरक्षा सतर्कतांसह, पात्र चालकांद्वारे पार पाडण्यात आल्या. यामुळे एक आदर्शच प्रस्थापित झाला आहे.भरलेल्या सोडियमचे शुद्धीकरण, प्राथमिक सोडियम उत्क्षेपकांच्या कार्यान्वयना-सोबतच पूर्ण केलेले आहे. द्वितीयक सोडियम उत्क्षेपकांचे पुनर्कार्यान्वयनही केलेले आहे. सर्व म्हणजे चारही र्हास-उष्णता-निष्कासन वाफजनित्र (एस.जी.डी. एच.आर.- SGDHR- Steam Generator for Decay Heat Removal) मंडले सोडियमने भरलेली आहेत आणि कार्यान्वितही केलेली आहेत. सध्या ४००ओसे वरील समतापमान चाचणीही पूर्ण झालेली आहे. इंधनभरणा-पूर्वीची सर्व पडताळणी प्रगतीपथावर आहे. त्यानंतर इंधनभरणा झाल्यावर क्रांतिकतेकडे पहिली वाटचाल व पुढील ऊर्जस्वल संचालन केले जाईल.

**प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीची सुरक्षात्मक वैशिष्ट्ये**

गरज पडताच अणुभट्टी सुरक्षितरित्या बंद करता येऊ शकते. बंद करण्याच्या प्रणालीची स्वतंत्रता, उपायवैपुल्य आणि विविधता तिला उच्च विश्वसनीयता प्रदान करते. नियंत्रक दंड, सुरक्षा दंड आणि विविध अन्य सुरक्षा दंडांच्या साहाय्याने हे साधले जाते.

दोन स्वतंत्र प्रकारच्या ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणाली

१. संचालन दर्जाची ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणाली जी वाफ-पाणी-प्रणाली विद्युत पुरवठ्यानिशी उत्क्षेपक चालवून सक्रियतेने ऱ्हास-उष्मा-निष्कासन करत असते आणि

२. सुरक्षा दर्जाची ऱ्हास-उष्मा-निष्कासन प्रणाली जी कोणत्याही विद्युत पुरवठ्याविनाच, अकर्मकतेने नैसर्गिक अभिसरणाद्वारे, ऱ्हास-उष्मा-निष्कासन करत असते.

आणीबाणीकरता प्रत्येकी ४,५०० किलो-व्होल्ट-अँपिअर्स क्षमतेची चार डिझेल जनित्रे, अणुद्विपाच्या अनुक्रमे पूर्व व पश्चिमेस दोन-दोन संख्येने, निरनिराळ्या इमारतींत, कार्यरत असतात. सर्व विद्युत पुरवठा बंद पडल्यास, ५०० किलो-व्होल्ट-अँपिअर्स क्षमतेची आणखी दोन जंगम डिझेल जनित्रे, आणीबाणीतील विद्युत पुरवठा चालू रहावा म्हणून संयंत्रक्षेत्रातच कार्यरत असतात.

अणुद्वीप समुद्रसपाटीपासून ९.७ मीटर उंचीवर वसलेले आहे. किनाऱ्यावर, किनारा सुरक्षा आणि त्सुनामी बंधाराही पुरवलेला आहे. संयंत्रात त्सुनामी लाटा शिरण्यास ते अटकाव करतात.

सुरुवातीस प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीत युरेनियम प्राणील व प्ल्युटोनियम प्राणील यांचे मिश्रण इंधन म्हणून वापरले जाईल २. इंधनाभोवतीचे आच्छादन इंधनाच्या पुनर्निर्मितीकरता वापरले जाते. या भागास पांघरूण (ब्लँकेट) म्हणतात. इंधनातून बाहेर पडणारे शीघ्र विरक्तक (न्यूट्रॉन्स) यात शोषले जाऊन यातील धातूचे रूपांतर विदलनक्षम धातूत होते. पुनर्प्रक्रियणानंतर हा विदलनक्षम धातू मग इंधन म्हणून वापरता येतो. वापरल्या जाणाऱ्या इंधनाहून नव्याने निर्माण होणारे इंधन जास्त असते, म्हणूनच अशा प्रकारच्या अणुभट्टीस 'प्रजनक अणुभट्टी' म्हटले जात असते. युरेनियम-२३८ चा उपयोग पांघरूण म्हणून केला जाईल. थोरियम-२३२ विदलनक्षम नाही. मात्र पांघरूण म्हणून वापरल्यास त्याचे अंशतः युरेनियम-२३३ या विदलनक्षम धातूत रूपांतरण होत असते. म्हणूनच या टप्प्यात थोरियम-२३२ चा उपयोगही पांघरूण म्हणून केला जावयाचा आहे. रुपांतरणात तयार होणाऱ्या युरेनियम-२३३ चा उपयोग तिसऱ्या टप्प्यातील अणुभट्ट्यांत इंधन म्हणून केला जाणार आहे. जगात थोरियमचा साठा आपल्याच भूमीत सर्वाधिक आहे. तिसरा टप्पाही कार्यान्वित

झाल्यावर, भारतातील थोरियम साठ्याचा पूर्णांशाने वापर होऊ लागून, आपल्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेकरता, आपण त्याचा उपयोग करून घेऊ शकू, कारण अशा प्रकारे वापरल्यास स्वदेशी थोरियम देशाला २५० वर्षांहूनही अधिक काळपर्यंत वीज पुरवू शकेल असे अनुमान आहे.

आणीबाणीच्या प्रसंगी सत्त्वर आणि सुरक्षितरीत्या बंद करता येऊ शकेल अशी, अंगभूत अकर्मक सुरक्षा वैशिष्ट्ये असलेली ही अणुभट्टी, तिसऱ्या पिढीतील प्रगत अणुभट्टी आहे. पहिल्या टप्प्यातील वापरलेल्या इंधनाचे पुनर्प्रक्रियण करूनच तिचे इंधन निर्माण होणार आहे. त्यामुळे अणुकचऱ्याच्या निर्मितीत लक्षणीय घट होणार आहे. त्याच्या भौगोलिक विल्हेवाटीच्या जागांचे क्षेत्रफळ घटणार आहे. प्रगत तंत्रज्ञान अनुस्यूत असूनही, या अणुभट्टीत निर्माण होणाऱ्या विजेचा दर, इतर अणुभट्ट्या व इतर पारंपारिक विद्युतनिर्मिती संयंत्रांशी तुल्यबलच असणार आहे.

भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाची ही वाटचाल दोन उद्दिष्टे साध्य करणार आहे. शाश्वत विकास आणि दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा. जबाबदार अणुऊर्जाधारक या नात्याने भारत शांततामय अणुविकासास कटिबद्ध आहे. सोबतच आण्विक आणि किरणोत्सारी सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे ध्येयही असणारच आहे.

या प्रकल्पामुळे आपण द्रव सोडियमची हाताळणी; शीघ्र विरक्तक नियंत्रण; प्रजनक अणुभट्टीची निर्मिती, कार्यान्वयन आणि संचलन; ही मोलाची अभियांत्रिकी कर्तबे साध्य केलेली आहेत. परिणामी भारतास दीर्घकालीन ऊर्जा-सुरक्षा लाभणार आहे. या प्रकल्पाच्या पाठीशी कार्यरत असलेल्या सर्व कुशल, अकुशल कार्यकर्त्यांना; त्यांच्या मोलाच्या अभियांत्रिकी निर्मितीखातर मनःपूर्वक धन्यवाद आणि अनेकानेक शुभेच्छा. हा प्रकल्प आपल्या देशास दीर्घकालीन ऊर्जाशाश्वती प्रदान करो हीच प्रार्थना.

**संदर्भ**

१. PFBR BHAVINI Brochure-6 Pages-Released June 2018 https://bhavini.nic.in/

२. भारतसरकारचे प्रसिद्धीपत्रक https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=2011347

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

---

[ पृष्ठ क्र. ५ वरून – **ऋतू कवितेचे – सजण दारी उभा (भाग २)** ]

पुन्हा वाचा. तुमचं हृदय गलबलेल. '**हीच मी ऐकिली जन्मजन्मांतरी**' ह्या ओळीने तुमचे डोळे भरून येतील. '**हृदय माझे कसे मीच हृदयी धरू?**' ही ओळ वाचल्यावर राधा-कृष्ण हे केवळ नावापुरते एकरूप नाहीत, तर ते किती एकजीव झाले आहेत याची जाणीव होऊन तुमच्या डोळ्यांतल्या सरी बरसतील. तिची कासाविसी त्याला बघून फिटली आणि आत्यन्तिक आनंद तिला झाला; तोच आनंद ही कविता वाचल्यावर तुम्हालाही होईल.

मित्रहो, कुणीतरी कुणाचीतरी वेड्यासारखी वाट बघत असतं, त्याला अर्थ असतो. कुणीतरी कुणाचीतरी त्याच आत्यन्तिक प्रेमापोटी भेट घेतं याला अर्थ असतो. त्यात सुख असतं. त्यात प्रेम असतं. त्यामुळे भेटत राहा. मला आशा आहे की, आजची ही कविता तुम्हाला नक्की आवडली असेल. भेटू या पुढच्या भागात. धन्यवाद.


**– श्रीपाद जोशी**

---

# घनपाठी दत्तात्रय पांडुरंग नवाथे : एक कृतार्थ जीवन

*वेदमूर्ती दत्तात्रय पांडुरंग नवाथे गुरूजी यांचे फाल्गुन शुद्ध १० शके १९४५ दि. १९/०३/२०२४ रोजी देहावसान झाले. त्यांच्या जीवनावर प्रस्तुत लेखात प्रकाश टाकला आहे : संपादक*

वेदमूर्ती दत्तात्रय पांडुरंग नवाथे गुरूजी यांचे फाल्गुन शुद्ध १० शके १९४५ दि. १९/०३/२०२४ रोजी देहावसान झाले.



गुरूजी हा शब्द मराठी भाषेत सर्वमान्य आहे. परंतु, वैदिक क्षेत्रामध्ये 'आचार्य' हा शब्द अत्यंत चपखल बसतो.

यः आचारान् चिनोति, विदधाति, वितरति च, सः आचार्यः।

नवाथे गुरूजी खरंच आचार्य होते. अनेक छोटे मोठे आचारधर्म, शास्त्रमान्य गोष्टी त्यांनी आपल्याजवळ गोळा केल्या होत्या. आत्मसात केल्या होत्या. नव्हे तर स्वतःमध्ये रुजवल्या होत्या. इथेच न थांबता सर्व आचार त्यांनी आपल्या हजारो शिष्यांना मुक्त हस्ताने प्रदान केले. असे आपले आचार्य आज जरी आपल्यात नसले तरी त्यांचे आचार, विचार, आठवणी आणि मुख्य म्हणजे गुरूतत्त्व हे आपल्याला सतत प्रेरणा देत राहील. म्हणूनच त्यांच्या चरित्राचा, एकूणच जीवनपटाचा उलगडा व्हावा म्हणून शब्दकुसुमांचा जीवनरुपी चित्रपट समोर मांडण्याचा प्रपंच !

दत्तात्रय पांडुरंग नवाथे यांचा जन्म श्रीशके १८६८ ज्येष्ठ कृ ८ ।। दि. ६/६/१९४६ यादिवशी निसर्गरम्य परिसरात गोव्यामध्ये झाला. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. गुरूजींचे मामा वे. शा. सं. विठ्ठल दुर्गाराम बोरकर गुरूजी यांनी या छोट्या दत्तात्रेयाला स्वतःजवळ घेतले. बोरकर गुरूजी स्वभावतःच तपस्वी वृत्तीचे होते. त्यांचे वेदाध्ययन व वेदनिष्ठा अत्यंत मोठी होती. साधारणतः १९५३-५४ च्या दरम्यान बोरकर गुरूजी वेद अध्यापनासाठी पुण्यामध्ये आले. त्याकाळी बोरकर गुरूजींचा स्नेह पुण्यातील श्रीमंत आबासाहेब पटवर्धन व विनायक शास्त्री फडके गुरूजी यांच्याशी जोडला गेला. तो काळ फार वेगळा होता. तत्त्वानुसार, धर्मानुसार जगणारी माणसे कार्यरत होती. बोरकर गुरूजींनी छोट्या दत्तात्रेयाचा उपनयन संस्कार केला आणि संध्यावंदनापासून सर्वकाही शिकवायला सुरुवात केली. पुरुषोत्तम उपाध्ये, रामचंद्र टेंग्से, गजानन बोरकर, मनोहर बोरकर, विष्णू बोरकर, वसंत फडके आदी सहाध्यायी अध्ययनात रत होते. त्यावेळेला पाठशाळांची फारशी आर्थिक सुबत्ता नव्हती. विद्यार्थी भिक्षा मागून शिकत असत. त्याला अनुसरून नवाथे गुरूजींच्या शिक्षणाला प्रारंभ झाला.

भारतीय परंपरेनुसार शब्दरूपावली, धातू रूपावली, अमरकोश असे प्राथमिक ज्ञान गुरूजींना मिळत गेले. हळूहळू नित्यविधी. ऋग्वेद संहिता, ऐतरेय ब्राह्मण, ऐतरेय अरण्यक यांचे शिक्षण सुरू होते. नव्हे तर छोट्या दत्तात्रेयाने कष्टाने, जिद्दीने हे शिक्षण पूर्णत्त्वाकडे नेले.

बोरकर गुरूजी आणि छोटा दत्तात्रय या मामा-भाच्यांचा ऋणानुबंध गुरू-शिष्य रूपाने बहरून गेला. आवश्यक असणाऱ्या परीक्षा छोटा दत्तात्रय हळूहळू पार करत होता.

**ब्राह्मणेन निष्कारणेन षडंगो वेदो अध्येतव्यः ज्ञेयश्च।**

या नियमनुसार अष्टमी, चतुर्दशी, पौर्णिमा या अनाध्याच्या दिवशी शिक्षा चतुष्टय, गृह्यसूत्र, श्रौतसूत्र, अष्टाध्यायी, निरुक्त हे सारे उपग्रंथ छोटा दत्तात्रय बोरकर गुरूजींच्या सान्निध्यात, सहाध्यायी मित्रांच्या सान्निध्यात कंठस्थ करत गेला. ऋग्वेदाचे १०५०० हून अधिक मंत्र मुखोद्गत झाल्यावर दत्तात्रेयाने पदपाठ, क्रमपाठ लीलया आत्मसात केला. हे अध्ययन दीर्घकाळपर्यंत चालू राहिले. सन १९७२ च्या दरम्यान प्रकृती अस्वास्थ्यामुळे छात्रांचा क्रमपाठ पूर्ण झाल्यावर वे. मू. बोरकर गुरूजी मायभूमी गोव्यात परतले.

दत्तात्रय पांडुरंग नवाथे या विद्यार्थ्याला त्या काळात वेदाच्या क्षेत्रातील जटा, घन या अवघड अध्ययनाची आस होती. ही आस त्यांनी त्याकाळचे पुण्यातील सुप्रसिद्ध घनपाठी वेदाचार्य दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकर गुरूजी ह्यांच्याकडे अध्ययन करून पूर्ण केली. अध्ययनाच्या एकूण प्रक्रियेत श्रीमंत आबासाहेब पटवर्धन यांची त्यांना साथ मिळाली. जटा व घन हे अवघड अध्ययन पूर्ण झाल्यावर पुण्यातील ख्यातनाम वेदशास्त्रोत्तेजक सभेची सर्वोच्च परीक्षा देऊन 'वेदचूडामणी' ही उपाधी त्यांनी प्राप्त केली. वेदाच्या क्षेत्रातील अनेक परीक्षा देऊन यश संपादन केले. आता एक नवीन ओळख निर्माण झाली घनपाठी दत्तात्रय पांडुरंग नवाथे !

मधल्या काळात पुण्यातील सुप्रसिद्ध वेदशास्त्र विद्यालय अर्थातच श्रीमंत आबासाहेब पटवर्धन वेदपाठशाळा येथे अध्यापनाचे काम गुरूजींनी आनंदाने स्वीकारले. ज्या पाठशाळेत विद्यार्थी म्हणून शिकावं, खडतर तपश्चर्या करावी, यश संपादन करावं त्याच पाठशाळेत मुख्याध्यापक म्हणून दीघर्काळ अध्यापन करावं यासारखं दुसरं कीर्ती पसरवणारं आणखी काय?

गुरूजींच्या अध्ययन-अध्यापनातून पटवर्धन पाठशाळेतून महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व आसपासच्या परिसरातील हजार-बाराशेच्या वर विद्यार्थी शिकून बाहेर पडले. अध्ययन-अध्यापन, यजन-याजन, दान-प्रतिग्रह ही षट्कर्मे गुरूजींनी आजीवन सांभाळली. मुंबई, गोवा, सातारा, पुणे, नगर, मिरज, कऱ्हाड या शहरांमध्ये विविध ठिकाणी होणाऱ्या ऋग्वेद संहिता स्वाहाकारांमध्ये गुरूजींचा सहभाग असे. अनेक वर्षांची परंपरा असलेल्या कऱ्हाडच्या ऋग्वेद संहिता स्वाहाकारात वेदाचार्य किंजवडेकर गुरूजी यांच्या स्नेहामुळे व गुरू-शिष्याच्या नात्यामुळे नवाथे गुरूजींचा सहभाग १९७२ सालापासून झाला. कऱ्हाडशी गुरूजींचा दीर्घकाळ स्नेह जोडला गेला. विशेषतः कऱ्हाड मधील सोनोपंत उमराणी गुरूजी व त्यांचा शिष्यवर्ग तसेच गरुड मामांचे राधाकृष्ण मंदिर व गरुड कुटुंबीय यांच्याशी गुरूजींचा संपर्क वृद्धिंगत झाला. कृष्णा-कोयनेच्या पवित्र संगमावर स्नानसंध्या, अनुष्ठान यामध्ये सहभागी होताना गुरुजींचा चेहरा आनंदून जायचा. यज्ञ-यागामध्ये, संहिता स्वाहाकाराध्ये मंत्रजागर होत असत. या वैशिष्ट्यपूर्ण मंत्रजागरांमध्ये ऋग्वेद संहितेपासून घनपाठापर्यंत पठण गुरूजी तल्लीनतेने करत असत. त्यांच्या आवाजाचा ठसा त्यामध्ये वेगळा उमटत असे. वेदाचे ज्ञान मुखोद्गत असल्याने गुरूजींची समरसता अधिकच उठून दिसे.

पुणे शहराचा आणि विद्वानांचा घनिष्ठ संबध सर्वज्ञात आहे. संस्कृत, शास्त्र, श्रौत अशा अनेक विद्याशाखा पुण्यात विस्तारित झाल्या. या सर्वांशी गुरूजी या ना त्या नात्याने जोडले गेले. समकालीन वैदिक फणसळकर, गुळसुंदकर, आठल्ये गुरूजी, दिनकर फडके गुरूजी,

वसंत फडके गुरूजी, पाध्ये गुरूजी अशा अनेक मान्यवर घनपाठी गुरूजनांच्या स्नेहाचा सुगंध नवाथे गुरूजींना लाभला. गुरूरूप दत्तात्रय पांडुरंग किंजवडेकर गुरूजी व नवाथे गुरूजी यांचा स्नेह बंध अतूटच होता. वे. मू. वसंत फडके गुरूजी व नवाथे गुरूजी हे सहाध्यायी व इतर अनेक सहाध्यायी यांचा गुरूजींना दीर्घकाळ सहवास लाभला.

याज्ञिक कर्मकाण्ड, स्मार्तकर्म, षोडश संस्कार यासंदर्भात गुरूजींचा अभ्यास अत्यंत सूक्ष्म होता. कर्मकाण्डातील छोटे छोटे विधी करताना ते अत्यंत काटेकोर कसे होतील याकडे गुरूजींचा कल असे. गुरूजी स्वतः तसे करत असत व बरोबरच्यांनाही तसेच करण्याचा आग्रह धरत असत. हे गुरूजींचे वैशिष्ट्य होते. पहाटे लवकर उठणे, आवृत्ती म्हणणे, संध्या, देवपूजा हे आचारधर्म ते मनापासून करत असत, विद्यार्थ्यांकडून तशी अपेक्षा ठेवत असत. अनेक घन पारायणामध्ये गुरूजींनी विशेष सहभाग नोंदवला. तसेच विद्यार्थ्यांच्या घन पारायणामध्ये निरीक्षक म्हणूनही काम पाहिले. पुण्यातील सहस्रबुद्धे समाधी मंदिर तसेच संस्कार नगरी बडोद्यातील हनुमान मंदिर येथे झालेल्या ऋग्वेदाच्या सामूहिक घनपाराणात गुरूजींचा लक्षणीय सहभाग होता. घनपाठी नवाथे गुरूजी यांचा महाराष्ट्र राज्य शासनातर्फे दिला जाणारा कविकुलगुरू कालिदास संस्कृत साधना पुरस्कार, महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान नाशिक यांचा पुरस्कार, श्री काणे महाराज बेळगांव अशा अनेक ख्यातनाम पुरस्कारांनी गुरूजी विशेष सन्मानित आहेत. वेदशास्त्रोत्तेजक सभा, सहस्रबुद्धे समाधी मंदिर पुणे, म्हैसूर, कांची आदी देशभरातील विविध वैदिक मौखिक परीक्षा घेणाऱ्या संस्थांमध्ये प्रमुख वेद परीक्षक म्हणून गुरूजींची नियुक्ती असे.

गुरूजींनी आजीवन अध्यापन केले. गुरूजींचे विद्यार्थ्यांवर अत्यंत प्रेम होते व विद्यार्थ्यांनाही गुरूजी हवेहवेसे वाटत. श्रीमंत आबासाहेब पटवर्धन व गुरूजींचा स्नेह कायमच राहिला. सर्वच वैदिक ज्ञानामध्ये गुरूजींचे निरीक्षण अतिशय सूक्ष्म असे होते. वेद मंत्रांचे पठण, याज्ञिक कर्मकाण्ड सुरू असताना चुका सांगण्याची गुरूजींची एक विशिष्ट पद्धत होती, रागवण्याचे एक तंत्र होते. गुरूजींच्या कपाळावर निर्माण होणाऱ्या आठ्या, चेहऱ्यावरचे हावभाव हे विद्यार्थ्याला सहज त्याची चूक निदर्शनाला आणून देत असत. विद्याध्ययनाच्या बाबतीत कठोर असणारे गुरूजी सामान्य जीवनामध्ये विद्यार्थ्यांना प्रसंगानुरूप मदत करत असत हा त्यांचा स्वभाव होता. शृंगेरी शंकराचार्य, कांची शंकराचार्य अशा मान्यवर धर्माचार्यांचा विशेष स्नेह व आशीर्वाद गुरूजींना सतत लाभला.

नवाथे गुरूजींनी अनेक छात्रांना शिकवले, घडवले. त्यामध्ये वे. मू. गोपाळ जोशी व वे. मू. भानुदास जोशी या दोन छात्रांचे सांग घनांत अध्ययन गुरूजींच्या कृतार्थ जीवनात वेगळा ठसा उमटवून गेले. यातील वे. मू. गोपाळ जोशी यांनी बेलबाग संस्थान पुणे येथे घनपारायण जेव्हा केले तेव्हा गुरूजींचे मुखमंडल विशेष प्रफुल्लित होते. गुरूजींचे आणखी एक प्रिय शिष्य देवदत्त पाटील गुरूजी यांनी शाखाध्ययनानंतर शास्त्राध्ययन परिपूर्ण केले व पंडित उपाधीस पात्र होऊन वेगळा ठसा उमटवला. याबाबतीत गुरूजी अत्यंत कृतार्थपणे बोलत असत. मलाही दीर्घकाळ गुरूजींचा स्नेह व गुरूकृपा लाभली. याशिवाय असे अनेक छात्र गुरूजींनी घडवले की जे आज अध्ययन-अध्यापन, यज्ञ-याग या क्षेत्रात विशेष नावलौकिक प्राप्त करतात. याचा गुरूजींना सार्थ अभिमान होता.

साधी राहणी, उच्च विचारसरणी रोजच्या जीवनामध्ये प्रसंगानुरूप मिश्कीलपणा, विनोदीपणा ही गुरूजींच्या स्वभावाची वैशिष्ट्ये सहज सुलभ होती.

(पृष्ठ क्र.२० वर)

प्रेमाशिवाय सेवा व्यर्थ आहे; प्रेम नसताना जर कोणी सेवा केली असेल,
तर ती सेवा नसते तो व्यापार असतो.

# संगीतायन
# नांदी : लेख २

*'संगीतायन' या लेखमालेतून आपण संगीत या विषयाशी जोडल्या गेलेल्या अनेक घटना, संगीत प्रकार, कलाकारांचे किस्से अशा अनेक गोष्टीचा आस्वाद घेणारा संवाद साधणार आहोत.*

*नांदी म्हणजे नाटकाच्या सुरुवातीला म्हणलेला इष्ट देवतांच्या नमनाचा किंवा प्रार्थनेचा श्लोक. म्हणजे एकाप्रकारे ईशस्तवनच. 'नांदी' या अभिजात संगीत कलाकृती बद्दलचा हा दुसरा लेख. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी पुण्यात 'संगीत शाकुंतल' च्या पहिल्या प्रयोगातील 'पंचतुंड नर रुंडमालधर' नांदीची रम्य कहाणी मागच्या लेखात आपण वाचली.*

*१८४३ सालच्या 'सीता स्वयंवर' या पहिल्या संगीत नाटकापासून सौभद्र, स्वयंवर, शाकुंतल, मानापमान, संन्यस्त खडग्, मूकनायक जय जय गौरीशंकर, कट्यार काळजात घुसली, बावनखणी अशा अनेकसंगीत नाटकांमध्ये विविध राग, ताल यामध्ये नांदी साकार झाली. अण्णासाहेब किर्लोस्कर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, वि.दा. सावरकर, विद्याधर गोखले, वसंत कानेटकर, पुरुषोत्तम दारव्हेकर अशा अनेक दिग्गज नाटककारांनी मराठी संगीतभूमीला चिरतरुण ठेवलं त्याचा हा रंजक आढावा. – संपादक*

मराठी नाट्यकलेला योग्य वळण लावून आधुनिक संगीत रंगभूमीचा पाया घालण्याचं श्रेय जातं 'संगीत शाकुंतल' चे नाटककार श्री बळवंत पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांना. त्यानंतर अण्णासाहेबांची 'सौभद्र', 'रामराज्य वियोग' ही नाटके पण रंगभूमीवर आली. 'संगीत सौभद्र' या नाटकानी अभूतपूर्व लोकप्रियता मिळवली. या नाटकातील पदांना अविट गोडी आहेच पण अभिजात संगीत रचनेच्या दृष्टीने सुद्धा त्यांचं वेगळं महत्त्व आहे. साकी, दिंडी, आर्या, कामदा, लावणी, दादरा असे अनेक प्रकार वापरून ही पदं अण्णासाहेबांनी संगीतबद्ध केली. 'संगीत सौभद्र' मध्ये जोडनांदी या प्रकाराचा अण्णासाहेबांनी उपयोग केला. 'नमुनी ईश चरणा' ही भूप रागामध्ये धुमाळी तालात तर त्याला जोडून 'तुम्हा तो शंकर सुखकर हो' बिलावल रागामध्ये दीपचंदी तालात त्यांनी बांधली. धुमाळी नंतर येणारा दीपचंदी ताल मनात लयीचं एक वेगळंच आवर्तन उभं करतो.




संगीत रंगभूमीवरचा एक महत्त्वाचा रंगकर्मी म्हणजे गोविंद बल्लाळ देवल. देवलांनी दुर्गा, मृच्छकटिक, विक्रमोर्वशीय, झुंजारराव, शापसंभ्रम, शारदा आणि संशयकल्लोळ अशी सात नाटक लिहिली. प्रसादपूर्ण, सोपी आणि मधुर पदरचना ही देवलांच्या नाट्य संगीताची ठळक वैशिष्ट्ये ! ब्रह्मदेव आणि इंद्र यांच्या पौराणिक कथानकावरचं नाटक म्हणजे 'शापसंभ्रम'. यातील केदार रागातील एक नांदी होती 'श्री नटनायक चिंतुनी' या नांदी मध्ये 'आधी बलवंता नमितो' असे शब्द आहेत. देवलांचं एक विशेष म्हणजे त्यांनी बळवंत पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांना आपलं गुरू मानलं होतं. म्हणून पदांच्या शेवटी गुरूचं नाव 'बलवंत' असा विनम्रपूर्वक उल्लेख ते करत असत.

देवलांचच एक अतिशय रंजक आणि हलकं फुलकं नाटक म्हणजे 'संगीत संशय कल्लोळ'. या नाटकात नांदी बरोबरच सूचक पद हा प्रकार नव्याने रंगभूमीवर आला. म्हणजे 'सौख्य सुधा वितरो' ही नांदी पडद्याआड होते. त्यानंतर पडदा उघडताच, एक साधू 'हृदयी धरा हा बोध खरा' हे सूचक पद म्हणत येतो. म्हणजे वृथा संशय धरणं योग्य नाही कारण त्यातून घोटाळे होतात हा 'संशय कल्लोळ' नाटकाचा संदेश या पदातून आपल्याला मिळतो.

देवलांनी 'मृच्छकटीक'हे नाटक शूद्रकाच्या मूळ संस्कृत 'मृच्छकटीकम्' नाटकावरून लिहिलं. अलीकडे चित्रित झालेला लोकप्रिय हिंदी चित्रपट 'उत्सव' याच नाटकावरून तयार झाला. एक सुस्वरूप, सहृदय गणिका वसंत सेना आणि पैशाने व्यापारी असलेला चारुदत्त यांच्या प्रेमाची ही कथा. शूद्रकाच्या 'मृच्छकटीकम्' आणि देवलांच्या 'मृच्छकटीक'या दोन्ही मध्ये शिवस्तुती करणारी नांदी आहे 'मृच्छकटीक'मधील नांदीचे शब्द आहेत 'वंदन त्या इशा'. 'मृच्छकटीक'चा अर्थ 'मातीचा गाडा'. या नाटकावर एक प्रायोगिक नाट्यप्रयोग डॉक्टर राजीव नाईक यांनी सादर केला 'मातीच्या गाड्याचे प्रकरण' आणि त्याला संगीत होतं भास्कर चंदावरकर यांचं. या नाटकाचं कथानक सांगणारं ज्याला आपण 'थीम साँग' किंवा 'सिग्नेचर ट्यून' म्हणू शकतो अशी नांदी या नाटकात होती. 'दीर दीर तन देरे ना' या तराणा सदृश नांदी मधून उज्जयनी नगरीमधील चारुदत्त व्यापारी आणि त्याच्या कथानकाचा आशय या नांदीत सांगितला जातो. 'मृच्छकटीक'या नाटकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इंग्रजी राजवटीच्या काळात शारवालिक राज्यक्रांतीची घटना चारुदत्त वसंत सेनेच्या प्रेमकथे बरोबर बेमालूम पणे मिसळून, अन्यायाविरुद्ध सामान्य जनता देखील कसा लढा देऊ शकते हे देवलांनी सहजपणे लोकांच्या मनात रुजवलं.

रंगभूमीचा सामाजिक आणि स्वातंत्र्य क्रांतीसाठी प्रभावी वापर करणारे असेच एक प्रतिभावान नाटककार म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. त्यांच्या 'संन्यस्त खड्ग' या नाटकातील यमन रागातील नांदीचे शब्द आहेत 'कितीतरी सुललित सहजगीती तार न बहू ताणी'. म्हणजे सावरकर नांदी मधून संदेश देतात की, कोणतीही गोष्ट अति प्रमाणात केली की हानिकारक ठरते. त्यांच्या संगीत 'उ:शाप' नाटकांमध्ये मध्ये वीर रस पोषक अशा शंकरा आणि हंसध्वनि रागातील 'देई उ:शाप हा, हिंदू जातीसी पहा' ही नांदी अत्यंत जोशपूर्ण आहे. समोर शत्रू उभा ठाकल्यावर अहिंसेचे गोडवे गाणं सर्वस्वी धोकादायक असतं हे ओजस्वी विचार नाटकाच्या माध्यमातून पण स्वातंत्र्यवीर सावरकर प्रभावीपणे मांडत होते. रंगभूमी माध्यमाचा इतका नेमका वापर करणारे देवल आणि सावरकर हे खरोखरच प्रयोगशील, प्रतिभावान आणि दूरदर्शी रंगकर्मी मराठी रंगभूमीला लाभले !!!

(क्रमश:)

**– डॉ. कीर्ती आगाशे**
विभाग प्रमुख – इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

•••

दिशा नियमित वाचा.


आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

शक्यतो कुणाचेही उपकार घेऊ नका; आणि जर का घेतले तर, त्या व्यक्तीलाही तशीच मदत करा.

# 'सुधारित नागरिकत्व कायद्या'चा संशोधनपूर्ण दस्तऐवज!

*टीका करण्यापेक्षा वा टीकेला बळी पडण्यापेक्षा विषयाचे गांभीर्य समजावून देणारा श्री. विजय कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

नुकतेच पाच राज्यांतील बिगरमुस्लीम शरणार्थींना भारताचे नागरिकत्व देण्यासंबंधीची अधिसूचना केंद्रीय गृहमंत्रालयाने जारी केली आहे. त्यानिमित्ताने पुन्हा एकदा 'सुधारित नागरिकत्व कायद्या'चा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. तेव्हा, या कायद्याची निकड आणि पार्श्वभूमी समजून घ्यायची असेल तर विभावरी बिडवे यांचे 'निर्वासितांच्या समस्या आणि सुधारित नागरिकत्व कायदा : मिथ्य आणि सत्य' हे पुस्तक एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरते.




विभावरी बिडवे या पेशाने पूर्ण वेळ वकील असल्याने कायद्यातील बारकावे समजून घेण्यात आणि इतरांनाही अगदी सोप्या भाषेत समजवण्यात त्यांचा हातखंडा आहेच. परंतु, या पुस्तकाची मांडणी करताना त्यांनी हा विषय केवळ 'सुधारित नागरिकत्व कायद्या'पुरताच मर्यादित ठेवलेला नाही. कारण, जर हा कायदा आणि या कायद्याची नेमकी गरज समजून घ्यायची असेल तर इतिहासाची पाने उलटावीच लागतील. म्हणूनच विभावरी बिडवे यांनी भारत-पाकिस्तान आणि नंतर पाकिस्तान-बांगलादेश फाळणीची पार्श्वभूमी अगदी नेमक्या शब्दांत विशद केली आहे.

पाकिस्तानातील अल्पसंख्याकांच्या दयनीय परिस्थितीवर लेखिकेने आकडेवारी, प्रसंगांसह सविस्तर भाष्य केले आहे. त्यावरून तेथील अल्पसंख्याकांची होणारी कुंचबणा आणि यमयातनांची प्रचिती येते. पाकिस्तानापासूनच विभक्त झालेल्या बांगलादेशमधील चित्रही तितकेच व्यथित करणारे.

पाकिस्तान असो वा बांगलादेश अथवा अफगाणिस्तान या देशातील केवळ हिंदूच नव्हे, तर इतर अल्पसंख्याकांना आश्रय देणे, त्यांना नागरिकत्व देऊन भारतीय मूळप्रवाहात मानाने सामील करणे हे या सर्वांचे सांस्कृतिक मूळ असलेल्या भारताचे कर्तव्यच आहे. तसेच, या सर्व स्थलांतरितांमध्ये नेमका कोणाकोणाचा समावेश होतो आणि का? स्थलांतरित-निर्वासित नेमके कोणाला म्हणावे? यांसारख्या या विषयाशी निगडित प्रत्येक लहानातल्या लहान मुद्यांवरही लेखिकेने या पुस्तकात चपखलपणे भाष्य केले आहे.

याचबरोबर नागरिकत्व कायदा १९५५ आणि २०१९च्या सुधारित नागरिकत्व कायद्यातील तरतुदी, नागरिकत्व कुठल्या आधारावर प्राप्त करता येते वगैरे या कायद्याच्या तांत्रिक बाजूंचा आढावा लेखिकेने पुस्तकात सविस्तरपणे सादर केला आहे.

निर्वासितांची समस्या ही केवळ भारतापुरतीच मर्यादित नसून गेल्या काही वर्षांत युरोपीयन राष्ट्रांनाही याकडे कधी नव्हे ते गांभीर्याने पाहण्याची वेळ आलीच.

अनुभवासारखा दुसरा गुरू नाही.

त्या अनुषंगाने जागतिक पातळीवरील घडामोडी आणि यासंबंधीचे कायदे याचाही धांडोळा लेखिकेने या पुस्तकात घेतला आहे.

कायद्याची भाषा, एखाद्या कायद्यावर आधारित पुस्तक म्हटलं की, सर्वसामान्यांचा काहीसा नकारात्मक सूर असतो. पण, विभावरी बिडवे यांनी या पुस्तकात वापरलेली भाषा ही अतिशय सोपी, सुटसुटीत असून ती अगदी शालेय विद्यार्थ्यांपासून ते 'युपीएससी'-'एमपीएससी'च्या विद्यार्थ्यांनाही सहज समजेल, विषयाचे लगेच आकलन होईल, अशीच आहे.

नागरिकत्व कायद्यासारखा क्लिष्ट विषय वाचकांसमोर मांडताना नकाशे, तक्ते, छायाचित्रे यांचा सुयोग्य वापर लेखिकेने या पुस्तकात केला आहे.

अगदी सामान्य वाचकांपासून ते या विषयातील अभ्यासक, माहीतगार यांच्याकडे संग्राह्य असावे, असे हे पुस्तक म्हणजे 'सुधारित नागरिकत्व कायद्या'चा संशोधनपूर्ण दस्तऐवजच म्हणावा लागेल.

पुस्तकाचे नाव : निर्वासितांच्या समस्या आणि सुधारित नागरिकत्व कायदा - मिथ्य आणि तथ्य

लेखिका : विभावरी बिडवे
प्रकाशक : कृष्णा पब्लिकेशन्स
पृष्ठसंख्या : २२१
मूल्य : २९९ रु.
टपाल : ४१ रु.
एकूण : ३४०/-

पुस्तकासाठी खालील क्रमांकावर फोन करावा. ज्ञानसाधना पुस्तकालय : ९४२१६०५०१९

**- विजय कुलकर्णी**
ज्येष्ठ पत्रकार, मुंबई

•••

(पृष्ठ क्र.१६ वरून - **घनपाठी दत्तात्रय पांडुरंग नवाथे : एक कृतार्थ जीवन**)

गुरूजींच्या समर्थ वैदिक जीवनात त्यांच्या पत्नी शुभांगी यांची त्यांना सातत्याने साथ होती. त्यामुळे गुरूजींचा गृहस्थाश्रम सफल झाला. प्रज्ञा, प्राची या दोन मुली, मुलगा अमेय व जान्हवी ही सून या कौटुंबिक जीवनामध्ये गुरूजी तल्लीन झालेले पाहायला मिळत.

यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ।।

या प्रसिद्ध वेदाच्या सायण भाष्यातील श्लोकाला साक्षी मानत अखेरच्या क्षणी धवलगृहात श्वास क्षीण झाला असला तरी माझे पवमान पठण चालू आहे. आता अखेरचा निरोप आहे. हा दत्तात्रय नृसिंहवाडी येथील दत्तात्रेयाच्या चरणी लीन होत आहे.

वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्मस्वनुष्ठीयतां
तेनेशस्य विधीयतामपचितिः काम्ये मतिस्त्यज्यताम्।
पापौघः परिधूयतां भवसुखे दोषोऽनुसंधीयतां
आत्मेच्छा व्यवसीयतां निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम्।

वरील शंकराचार्य कृत श्लोकाला अनुसरून जीवन जगणाऱ्या दत्तात्रेय लीन गुरूजींना जर खरी श्रद्धांजली वाहायची असेल तर गुरूजींचा आचार-विचार, अध्ययन-अध्यापन, यजन-याजन हे सतत शास्त्रनिष्ठेने चालू ठेवणे याशिवाय दुसरे काही नाही...

**कृपासिंधू दत्तात्रय शिष्य-विनायक मोहनराव गरुड**
कऱ्हाड
मोबा. ९४२०४९३५०६/८३०८१९१४०८

•••

# ३१ जानेवारी १९४८ –
# छत्रपती शिवाजी आणि संभाजी महाराजांचे स्वप्न साकार

*३१ जानेवारी १९४८ रोजी झालेल्या एका विशेष ऐतिहासिक घडामोडी बद्दल लंडन येथील इतिहास संशोधक संकेत कुलकर्णी यांचा लेख – संपादक*

भारत जरी १५ ऑगस्ट १९४७ ब्रिटिशांपासून स्वतंत्र झाला असला तरी ब्रिटिशांचे मांडलिक असलेल्या सिद्दी नवाबाच्या जंजिरा संस्थानाच्या पारतंत्र्यातून मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन हे तीन तालुके मुक्त व्हायला ३१ जानेवारी १९४८ चा दिवस उजाडावा लागला.

थोडासा इतिहास बघू या. १६१७ मध्ये सिद्दी अंबर याने मुघल बादशहाकडून स्वतंत्र सनद मिळवून जंजिऱ्याची जहागीर मिळवली आणि मुघलांचे मांडलिकत्व पत्करले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रयत्न करूनही थोडक्यात जंजिरा हातातून निसटला. त्यांना जर या मोहिमेसाठी पुरेसे आयुष्य आणि पुरेसा वेळ मिळाला असता तर त्यांच्यासाठी जंजिरा जिंकणे अशक्य नव्हते. छत्रपती संभाजी महाराजांच्या हातात जंजिरा येत आहे हे पाहून औरंगजेबाने त्याची फौज कल्याण भिंवडीच्या मार्गे रायगडाच्या दिशेने पाठवली. त्यामुळे नाईलाजास्तव संभाजी महाराजांना रायगडावर परत यावे लागले. मराठ्यांच्या हाती जाऊ नये म्हणून मोगल, इंग्रज, आणि पोर्तुगिजांसारख्या शत्रूंनाही एकत्र आणणारा जंजिरा हा बहुतेक एकमात्र किल्ला!


१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यावर सिद्दी नवाबांनी इंग्रजांचे मांडलिकत्व पत्करले. पुढे १९४८ पर्यंत तो नवाबांच्याच ताब्यात होता. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर शेवटच्या नवाबाला – सिद्दी मोहम्मद खान त्याचे नाव – भारतात सामील होणे मान्य नव्हते. त्याला जंजिरा संस्थान पाकिस्तानात न्यायचे होते. विचार करून पहा – सध्याच्या महाराष्ट्राचा एक भाग जर पाकिस्तानचा भाग बनला असता तर कसे चित्र दिसले असते? आणि त्यात वर पेशव्यांची मूळ गावं श्रीवर्धन आणि हरिहरेश्वर वगैरेंसकट!


आपल्याला हे माहीत असते की, काश्मीर, जुनागढ, आणि हैदराबादच्या नवाबांनाही भारतात विलीन व्हायचे नव्हते; पण मिलीटरी ॲक्शनने त्यांना भारतात सामील केले गेले. पण इथेही जंजिरा स्वातंत्र्यलढ्याचे वेगळेपण आहे. जनतेने एकत्र उठाव करून विलिनीकरण झालेले जंजिरा हे भारतातील एकमेव संस्थान आहे. या संस्थानचा नवाब मुस्लीम, तर प्रजा प्रामुख्याने हिंदू होती. पण तरीही हैदराबादप्रमाणे हा लढा मुसलमानांच्या विरुद्ध हिंदू असा नसून भारतात विलीन होण्यास इच्छुक नसलेला जंजिऱ्याचा नवाब विरुद्ध भारतात विलीन होण्यास


city. The situation is now reported to be under control."

On Other Pages

| | Pages |
|---|---|
| A Letter From London | 8 |
| Hyderabad Leader's Warning | 10 |
| Self Rule In Janjira | 10 |
| Bombay Port Strike | 14 |
| Pandit Nehru In Amritsar | 11 |
| Agricultural Research | 12 |
| Sports | 14 |
| Commercial | 4 |
| Weather | 15 |
| Broadcasting | 15 |
| Indian Screen | 15 |





**(१) ३१ जानेवारी १९४८ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया' च्या कोपऱ्यात पान १० वर आलेली जंजिरा विलिनीकरणाची छोटीशी बातमी. (२) जंजिरा संस्थानाचा नकाशा – ब्रिटिश लायब्ररीतल्या गॅझेटमधून. (३) जंजिरा संस्थानाचा झेंडा.**

---

कोणी कितीही चिडवण्याचा प्रयत्न केला, तरी मनावर संयम ठेवणे शांत राहणे;
हेच खरे शौर्याचे लक्षण आहे!

इच्छुक असलेल्या अठरापगड जातींचा होता – ज्यात हिंदूही होते आणि मुसलमानही होते! क्रांतीवीर नाना पुरोहित यांनी 'प्रजा परिषद' या संघटनेद्वारे समाजातील ह्या सर्व घटकांना जवळ करून सैन्य उभे केले. २८ जानेवारी १९४८ रोजी म्हसळा, तर ३० जानेवारी १९४८ रोजी श्रीवर्धन ताब्यात घेतले. लोकांच्या दबावामुळे घाबरलेल्या नवाबाने ३१ जानेवारी १९४८ रोजी सामीलनाम्यावर सही केली आणि जंजिऱ्यावर तिरंगा फडकला!

अधिकृतपणे जंजिरा संस्थान रक्ताचा एकही थेंब न सांडता स्वतंत्र भारतात विलीन करण्यात झाले. ३३१ वर्षांची परकीय सत्ता (१६१७ ते १९४८ ह्या ३३१ वर्षांत २० सिद्दी नवाब झाले!) संपली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचे जंजिरा परकियांच्या ताब्यातून सोडवून स्वराज्यात परत आणण्याचे स्वप्न पूर्ण झाले. अजिंक्य जंजिरा लोकांच्या लढ्यापुढे नमला. पण दुर्दैव म्हणजे आज आपण ही गोष्ट विसरूनही गेलेलो आहोत. अजिंक्य समजल्या जाणाऱ्या जंजिऱ्याची घमेंड जनतेच्या स्वातंत्र्याच्या ध्यासाने मोडली. तेथे लोकशाहीचे पर्व सुरू झाले. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे याच लोकशाहीत या लढ्याची उपेक्षा झाली. आज निदान हैदराबाद मुक्ती संग्रामाची आठवण तरी मराठवाड्यात शासकीय पातळीवर साजरी केली जाते; मग जंजिरा मुक्ती संग्रामाची आठवण का नाही येत कोणाला? कारणं काहीही असोत; आजच्या दिवसातला फक्त एक क्षण आपल्याला 'आजच्या दिवशी जंजिरा मुक्त झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि छत्रपती संभाजी महाराजांचे एक अपूर्ण स्वप्न ह्या दिवशी पूर्ण झाले' – इतकी निदान आठवण जरी झाली तरी पुरे – नाही का?

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

●●●

(मुखपृष्ठ क्र.२ वरून – **संपादकीय**)

यांनी अतिशय समर्थपणे केले. योग्य प्रश्न विचारून ते नारळीकरांकडून अगदी अचूक अशी माहिती मिळवित असत. त्यांचा हा कार्यक्रम फारच लोकप्रिय झाला होता. प्रयोग-दिग्दर्शन हा विज्ञान प्रसाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याचा देखील सोवनी सर खूप चांगला फायदा करून घेत असत. प्रयोगासाठी खूप मोठे साहित्य घेऊन जाणे त्यांना आवडत नसे. शाळेच्या प्रयोगशाळेतील सूक्ष्मदर्शक आणि आजूबाजूला असणाऱ्या वस्तू त्यांना पुरत असत. वेगवेगळ्या झाडांची पाने घेऊन ते त्यांचे छेद मिळवत आणि सूक्ष्मदर्शकातून निरीक्षण करायला सांगत असत. सूक्ष्मदर्शकाचा वापर करून स्फटिकाची वाढ कशी दाखविता हे त्यांनी मला शिकविले. त्याचबरोबर वनस्पतीचे हर्बेरिअम कसे करावे आणि लहान प्राण्यांच्या हाडांचे सांगाडे कसे करावेत हे देखील मी त्यांच्याकडून शिकलो.

आपल्या सहकाऱ्यांना मदत करणे हे सोवनी सरांचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कुणी त्यांच्याकडे मदतीसाठी गेला, की हातचे काम सोडून ते मदत करीत असत. स्वतः त्यांनी पीएचडीसाठी प्रबंध लिहिला नाही, परंतु मला प्रबंध लिहायला त्यांनी मदत केली. आपले मत प्रभावीपणे कसे मांडावे हे त्यांनी मला शिकविले. १९८४ मध्ये ते 'होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रातून' निवृत्त झाले. त्यानंतरही आम्ही वेगवेगळ्या मंचावर भेटत राहीलो. निवृत्तीनंतर देखील त्यांचा विज्ञान प्रसाराचा उत्साह कायम होता. १ मे २००७ रोजी मुंबईत माहीम येथील निवासस्थानी त्यांनी शेवटचा श्वास घेतला. २०२४ हे त्यांच्या जन्माचे शताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने या महान आत्म्याला अभिवादन करू इच्छितो. त्यांचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना वाहिलेली श्रद्धांजली ठरेल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

अपयशाची भीती ही सर्वात मोठी भीती होय!

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**राज्य पुरस्कार २०२३–२०२४**



१ आदित्य सचिन सासणे

२ सोहम सुयोग पेणकर

३ भार्गव अवधूत कोळी

४ धन्य विसारिया

५ आलेख राजेश राऊत

६ वीर अजय भोजने

**राष्ट्रीयस्तरीय स्पेल बी परीक्षा २०२३–२४**



| अनु क्रमांक | नाव | गुण |
|---|---|---|
| १ | कार्तिकी शिंदे | १०० |
| २ | आनिका गोळे | ९४ |



हिस्ट्री टॅलेंट सर्च परीक्षा २०२३–२४ मध्ये इयत्ता ९ मधील कुमार अर्चित राऊत या विद्यार्थ्याने १०० पैकी ९९ मिळवून महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला.



इनर व्हील इंडिया, साक्षरता मिशन नॅशन बिल्डर पुरस्कार २०२३–२४ चे विजेते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**संक्रांत – १६ जानेवारी**

सूर्याचे संक्रमण म्हणजे संक्रांत. भारतात जवळपास सर्व राज्यांत विविध नावाने व पद्धतींनी साजरा केला जाणारा संक्रांत सण. या बद्दलची माहिती शिक्षकांनी मुलांना परिपाठात दिली. सूर्यदेवाचा श्लोक म्हटला. 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' असे म्हणून तिळाची वडी मुलांना खाऊ म्हणून देण्यात आली.

नर्सरी – पतंगाचे चित्र रंगवणे.

ज्यूनियर – घोटीव कागदाचे पतंग करणे.

सीनियर – चित्रकलेच्या वहीत विविध आकारांचे पतंग काढणे.

**गाण्याचे सादरीकरण – १९ जानेवारी**

नर्सरी – कुठल्याही भाषेतील एका गाण्याचे मुलांनी

सादरीकरण करायचे. पालकांनी मुलांकडून करून घेतलेली तयारी मुलांच्या सादरीकरणातून दिसत होती.

ज्यूनियर / सीनियर - राईम डे

एक इंग्रजी गाण्याचे सादरीकरण करणे.

मुलांच्या अंगी सभाधीटपणा आणण्यासाठी अशा उपक्रमांचा उपयोग होतो.

**अयोध्या राम मंदिर स्थापन दिवस २० जानेवारी २०२४**

परिपाठात शिक्षकांनी याबद्दल माहिती दिली. राम बाप्पाचा गजर, श्लोक व भजन असे सादरीकरण अनुक्रमे नर्सरी, ज्युनिअर व सीनियरच्या मुलांनी केले. दुसऱ्या दिवशी या प्रतिष्ठान समारंभाबद्दल मुलं शिक्षकांशी भरभरून बोलत होती.

**प्रजासत्ताक दिन - २५ जानेवारी**

यावर्षी भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिवस सर्व देशभर २६ जानेवारी रोजी साजरा झाला. मुलांनी २५ जानेवारीला झेंड्याचे रंग असलेले कपडे परिधान केले होते. प्रजासत्ताक दिवसाची माहिती, दिल्लीत कर्तव्यपथावर होणारे संचलन, झेंड्याचा मान राखणे, याबद्दलची माहिती मुलांना देण्यात आली. झेंड्याची देशभक्तीपर अशी गाणी मुलांनी हातात झेंडा धरून गायली. शाळेच्या आवारात सीनियरच्या मुलांनी झेंडा हातात घेऊन सलाम करत संचलन केले.

**एका वस्तुबद्दल बोलणे (Show and Tell Activity) - २९ जानेवारी २०२४**

नर्सरी व ज्युनिअर के.जी. च्या मुलांसाठी हा उपक्रम घेतला गेला. मुलांनी त्यांची आवडती भाजी, फळ, वस्तू, खेळणं, यापैकी एक वस्तू हातात धरून त्या विषयी चार ते पाच ओळी इंग्रजीतून बोलणे अशा स्वरूपाचा हा उपक्रम असतो. मुलांनी उत्साहाने याला भरभरून प्रतिसाद दिला.

**वक्तृत्व - १ फेब्रुवारी**

सीनियरच्या मुलांसाठी हा उपक्रम घेतला जातो. यावर्षी 'माझा आवडता खाद्यपदार्थ, माझी आवडती जागा (पर्यटन स्थळ), माझा आवडता पाळीव प्राणी', असे विषय दिले होते. यापैकी एका विषयावर पाच ते सहा ओळीत इंग्रजी मधून मुलांनी बोलायचे होते. मुलांचा आत्मविश्वास बघून या उपक्रमाचा उद्देश सार्थ झाला.

**शाळेत मुक्काम ३ फेब्रुवारी शनिवार संध्याकाळ**
**४ फेब्रुवारी रविवार सकाळ**

जानेवारी महिना सुरू झाला की सीनियरच्या मुलांना शाळेत मुक्काम करण्याच्या उपक्रमाची उत्सुकता लागलेली असते. ३ फेब्रुवारी शनिवारी संध्याकाळी ७ वाजता मुलं छोट्या छोट्या बॅग सांभाळत शाळेत आली. सामान आपल्या वर्गात ठेवून खेळण्यात गुंग झाली. नंतर सर्वांचे एकत्रित गाणं, नृत्य असे सादरीकरण झाले. काही खेळ सुद्धा खेळले गेले.

नंतर हात स्वच्छ धुवून सर्व मुलं जेवणासाठी तयार झाली. पुरी-भाजी व श्रीखंड असा मुलांचा आवडीचा मेनू असल्याने मुलांनी ताव मारला. शाळेच्या पटांगणात शेकोटीचा कार्यक्रम झाला. शेकोटीची उब घेत मुलांनी विविध गाणी गायली. पुन्हा एकदा हातपाय धुऊन मग रात्रीचे कपडे घालून झोपायची तयारी केली. शिक्षकांच्या मदतीने अंथरणे घालून आपल्या मित्र-मैत्रिणी शेजारी मुलं झोपली.

रविवार ४ फेब्रुवारीला सकाळी ब्रश करून मुलं घरी जायला तयार झाली. सकाळी ७ वाजता आपली बॅग सावरत या उपक्रमाच्या गोड आठवणींसह मुलांची रवानगी झाली. ज्यूनियरच्या पालक सौ. अनुराधा भोसले या प्रतिनिधी म्हणून शिक्षकांसोबत या मुक्कामी कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

---

जूलूम सहन करणे म्हणजे सोशिकपणा नव्हे; परमार्थही नव्हे; ती केवळ लाचारी आहे.

**सहल – १२ फेब्रुवारी २०२४**

शाळेतील अजून एक आनंददायी उपक्रम. यावर्षी पूर्व प्राथमिक विभागाची सहल 'बच्चा पार्टी' मानपाडा ठाणे येथे नेण्यात आली. सकाळी ९ वाजता मुलं शाळेत जमली. ९:३० वाजता 'गणपती बाप्पा मोरया' म्हणून पालकांचा निरोप घेऊन निघालेल्या आमच्या दोन बसेस मधून ३० मिनिटांतच सहलीच्या ठिकाणी पोहोचली. आपले सामान ठेवून तिथे असलेल्या विविध खेळांकडे मुलांनी धाव घेतली. खेळून दमल्यावर अंदाजे १२:३० वाजता मुलांना हात धुऊन श्लोक म्हणून जेवण्यासाठी एकत्रित केले गेले. पावभाजी व नूडल्स असा मुलांच्या आवडीचा बेत होता. त्यानंतर गाणी, गप्पा–गोष्टी, नृत्य या सगळ्यांचा आनंद मुलांनी घेतला. ज्युनियरच्या सौ. रुचिरा काळे या पालक प्रतिनिधींनी सहलीला आपली उपस्थिती लावली होती.

**वार्षिक कला व विज्ञान प्रदर्शन – २० फेब्रुवारी**

मुलांनी केलेल्या अनेक शोभेच्या वस्तू, त्यांची चित्रे, विज्ञानातील संकल्पनांवर प्रयोग या सर्वांनी युक्त असे हे आमचे वार्षिक प्रदर्शन यावर्षी २० फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. नर्सरी विभागात स्थूल व सुक्ष्म स्नायूंच्या साठीचे उपक्रम, – जसे चिमट्याने वस्तू उचलणे दोन वस्तू (राजमा, छोटे विविध रंगांचे मणी) वेगळे करणे असे प्रकल्प होते.

ज्यूनियरच्या मुलांनी जलचर, गणितातील विविध आकार, फळातील बियांच्या संख्येवरून माहिती देण्यासारख्या उपक्रमांची मांडणी व माहिती दिली. सीनियरच्या मुलांनी कल्पवृक्ष, चंद्रयान३, फुलपाखरांच्या जीवनाचे टप्पे अशा विषयांवर उपस्थितांना माहिती दिली.

**सॅलड – नर्सरी / ज्यूनियर**

भाषा, गणित विषयांसोबतच महत्त्वाचा विषय म्हणजे परिसर अभ्यास (प्रकल्प – Project). त्यात भाज्यांची माहिती देणारा प्रकल्प चालू असताना एक दिवस सॅलेडचा उपक्रम घेतला. आपण आहारात ज्या भाज्या कच्च्या खातो म्हणजे काकडी, बीट, गाजर, टोमॅटो इत्यादी शिक्षकांनी आणल्या. सर्व भाज्या स्वच्छ धुऊन चिरल्या. मुलांना चाट मसाला व मीठ घालून खायला दिल्या. नर्सरीत २५ रोजी, तर ज्यूनियरला २३ फेब्रुवारी या दिवशी हा उपक्रम घेतला गेला.

**पालक सभा – २० जानेवारी / १६ मार्च**

या दिवशी पालक सभांचे आयोजन करण्यात आले होते. पालकांच्या शंकांचे निरसन, नवीन उपक्रमांची माहिती, तसेच मुलांच्या निरीक्षण नोंदी या विषयी पालक सभेत चर्चा झाली.

**पपेट शो – बाहुल्यांचा खेळ – २१ मार्च**

नर्सरी व ज्यूनियर के. जी. च्या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या पहिल्या तासिकेतच पपेट शोचे आयोजन करण्यात आले होते. चार प्राण्यांची गोष्ट शिक्षकांनी पपेटसच्या सहाय्याने मुलांना सांगितली. मुलांनी ह्या उपक्रमाचा मनमुराद आनंद लुटला.

**सुरक्षा उपाय चांगला / वाईट स्पर्श – २० मार्च**

सार्वजनिक, तसेच गर्दीच्या ठिकाणी स्वतःची काळजी कशी घ्यायची. चांगला / वाईट स्पर्श कसा ओळखायचा याबद्दल पालकांना किंवा शिक्षकांना त्वरित माहिती द्यायची. याची माहिती मुलांना दिली गेली.

धारदार वस्तू विजेच्या वस्तू याबरोबर खेळल्याने उद्भवणारे धोके याबाबतीत मुलांना चित्र–तक्ता याद्वारे माहिती दिली गेली.

**मुगाला मोड आणणे सॅलेड – ५ मार्च**

सीनियरच्या मुलांना कडधान्य मूग दाखवले मग स्वच्छ धुऊन पाण्यात भिजत घातले. दुसऱ्या दिवशी

मोड आलेले मूग शिजवून चाट मसाला घालून मुलांनी त्याचा आस्वाद घेतला.

**एकत्रित चित्र काढणे बनी टमटोला उपक्रम**

नर्सरी, ज्युनिअर व सीनियर अशी ३ वर्षे दर बुधवारी मुलं बनीचा एप्रन घालतात. विविध उपक्रम या अंतर्गत घेतले जातात. सीनियरचा या अंतर्गत घेतलेला जाणारा हा शेवटचा उपक्रम. सीनियरच्या सर्व मुलांनी एकत्रित बसून आपल्या वहीत बाग म्हणजेच गार्डन या विषयावर चित्र काढले.

बनी टमटोलाचा या तीन वर्षांचा कार्यक्रम पूर्ण केल्याबद्दल सर्व मुलांना त्यांच्या वार्षिक निकालासोबत प्रशस्तीपत्रक दिले जाते.

**होळी – २२ मार्च**

मराठी वर्षातील हा शेवटचा सण होळी. २२ तारखेला मुलांनी साधे कपडे परिधान केले होते. नैसर्गिक रंगाने व पाण्याचा अपव्यय न करता होळी साजरी करा असे शिक्षकांनी सांगितले. होळीचे गाणे, होलिकाची गोष्ट, मुलांना या दिवशी सांगितली. त्यांनी तयार केलेल्या नैसर्गिक रंगांचा उपयोग करून मुलांनी शाळेत होळी साजरी केली.

**वार्षिक निरीक्षण (II Observation)**

द्वितीय सत्रात सर्व विषयात शिकवलेल्या विविध संकल्पनांवर आधारित असे हे निरीक्षण २६ मार्च ते ८ एप्रिल या कालावधीत घेतले जाणार आहे.

**गुढीपाडवा – ८ मार्च**

हिंदू कालगणनेप्रमाणे नवीन वर्षाची गोड सुरुवात गुढीपाडवा या सणापासून होते. गुढी कशी व का उभारायची याची माहिती, गुढीची छोटी प्रतिकृती दाखवून मुलांना दाखवण्यात आली. नूतन वर्षाच्या शुभेच्छा सर्वांनी एकमेकांना दिल्या.

**छंद वर्ग – १० एप्रिल ते १९ एप्रिल**

वार्षिक निरीक्षणानंतर अंदाजे एक आठवडा छंद वर्ग घेतले जातात. टाकाऊ व सहज उपलब्ध असणाऱ्या वस्तू जसे कागदी ग्लास, घोटीव कागद, इत्यादी पासून सुंदर वस्तू तयार करण्यास या दरम्यान शिकवले जाते. लिंबू सरबत, मोनॉको चाट, उपक्रम तर योगा, तालावर व्यायाम प्रकार (musical aerobics), असेही नवीन गोष्टी या दरम्यान घेतल्या जातात.

**वार्षिक निकाल – २९ एप्रिल**

दुसऱ्या निरीक्षणाचा निकाल या दिवशी प्रगती पुस्तकाद्वारे पालकांना येणार आहे.

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी ऑनलाईन ट्रेडिंग ऑफ सिक्युरिटीज या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी एकूण १२२ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्राजक्ता खामकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षणही देण्यात आले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागातर्फे विद्यार्थीकेंद्रित उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांचा सहभाग या अनुषंगाने अस्तित्वात्मक माघार या विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. एकूण १६ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञान विभाग, मानसशास्त्र विभाग आणि समुपदेशन कक्ष यांच्या तर्फे मूल्यवर्धित अभ्यासक्रम – 'Philosophical Praxis-The Art of Critical Thinking and Logical Reasoning' याचे आयोजन दिनांक २७ फेब्रुवारी ते

१३ मार्च २०२४ या दरम्यान करण्यात आले होते. सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रिया वैद्य, रुता वैती, पिटर अकबर, वृषाली गुप्ते, सचिदानंद सिंग, आदित्य जाधव, वेदवती परांजपे, भक्ती गायकवाड, सुरभी खरे, चैत्रा देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमात ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे शेअर मार्केट, बँकिंग क्षेत्र परिचय शाळेतील विद्यार्थ्यांना करून देण्यात आला. यावेळी अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी आणि प्रा. डॉ. प्रकाश जंगले उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या गणित - सांख्यिकी विभागातर्फे गणिताचे मजेदार खेळ, वैदिक गणिताच्या युक्त्या यांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचसोबत योग शिबिर - प्राणायाम आणि सूर्यनमस्कार यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजण्यात आले. यावेळी या विभागाचे विद्यार्थी, प्रा. ऋतिका निमणकर आणि श्री. महेश दुधभाते उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे महाविद्यालयाचा वार्षिक वृत्तपत्र 'ऋता' चे प्रकाशन गुरुवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक महाराष्ट्र टाइम्स चे निवासी संपादक श्री समीर कर्वे उपस्थित होते. वृत्तपत्र तयार करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे या अनुषंगाने याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १३८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागातर्फे गुरुवार दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजी नवीन माध्यमांद्वारे भारतीय संस्कृतीचे चित्रण या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक महाराष्ट्र टाइम्स चे निवासी संपादक श्री समीर कर्वे व मराठी चित्रपट अभिनेते श्री. भूषण पाटील उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी भूगोल विभागातर्फे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात खडकांचे प्रकार, फळ भाजांचे प्रकार, फळांचे प्रकार, फुलांचे प्रकार, पालेभाजांचे प्रकार, मातीचे प्रकार अशा जवळपास २५० हून अधिक नमुने मांडण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे विद्यार्थी आणि प्रा.अर्चना डोईफोडे, प्रा. शिवाजी नाईक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी, गावकऱ्यांनी प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी इंग्रजी विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषण कौशल्य वाढवण्यासाठी, साहित्यिक कौशल्य विकसित करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. यावेळी इंग्रजी विभागाचे विद्यार्थी व प्रा. प्रफुल्ल भोसले उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयाच्या जिमखाना विभागातर्फे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. मुलांना या खेळांची ओळख आणि नियम तंत्र शिकविण्यात आले. सांघिक एकतेचे महत्त्व समजवण्यात आले. यावेळी

जिमखाना सदस्य विद्यार्थी, आणि प्रा. रोहिणी डोंबे उपस्थित होत्या. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी खेळाचा मनमुराद आनंद घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे हिंदी भाषा संवाद कौशल्य, हिंदी व्याकरण आधारित उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील हिंदी विभागाचे विद्यार्थी आणि प्रा. डॉ. अनिल ढवळे उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी इतिहास विभागातर्फे महाराष्ट्रातील गडकिल्ले या संदर्भातील कोडे, ओरिगमी हस्तकला अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील इतिहास विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक अंकुर काणे उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी मराठी विभागातर्फे म्हणी, वक्तृत्व, कविता वाचन, वृत्तपत्र वाचन अशा विविध उपक्रमांचे अनाई स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना विविध बक्षिसे देण्यात आली. त्याचसोबत मराठी विभागातर्फे शाळेच्या ग्रंथालयाला रॅपिडेक्स इंग्लिश स्पीकिंग कोर्स, परफेक्ट मराठी इंग्लिश स्पीकिंग कोर्स ही पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी मराठी विभागाचे विद्यार्थी आणि प्रा.रुपेश महाडिक उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी मानसशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांना भावना ओळखण्यावर संबंधित उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मानसशास्त्र विभागाचे विद्यार्थी आणि प्रा. सुरभी खरे उपस्थित होत्या.

जोशी बेडेकर महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या उंबरमाळी गावी सामाजिक जबाबदारी दायित्त्वातून उंबरमाळी जिल्हा परिषद शाळेत दिनांक १ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञान विभागातर्फे नैतिक कथाकथन आणि प्रार्थना पठण यावर आधारित उपक्रम घेण्यात आले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या IQAC विभागातर्फे दिनांक २ मार्च २०२४ रोजी NAAC संदर्भातील क्रायटेरिया ३ आणि ४ संदर्भात अर्ध दिवसीय कार्यशाळेचे आयोजन प्राध्यापकांसाठी करण्यात आले होते. यावेळी डॉ.प्रमोद पाब्रेकर (रुसा चे वरिष्ठ सल्लागार), डॉ. चंद्रकांत रावळ (माजी व्यवस्थापक MSFDA), प्रा. डॉ. वाणी लातूरकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला ६० प्राध्यापक उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र आणि DLLE विभागाच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २ मार्च २०२४ रोजी मोखाडा विभागातील क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच तेथील सर्वेक्षण करण्यात आले. आदिवासी समस्या आरोग्य व्यवस्था आणि आरोग्य समस्या यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी ४२ विद्यार्थी आणि प्रा. स्वप्नील मयेकर यांनी सहभाग घेतला होता.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता कक्षातर्फे आम्ही उद्योगिनीची २६वी परिषद या कार्यक्रमात सहभाग घेतला. मीनल मोहाडीकर यांनी मार्गदर्शन केले. एकूण १२ विद्यार्थी या उपक्रमात

सहभागी झाले. दिनांक २ मार्च २४ रोजी सदर परिषद संपन्न झाली.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे दिनांक ८ मार्च २०२४ रोजी विशाखा समितीची मार्गदर्शक तत्त्वे या संदर्भात मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्याना या समिती बद्दल माहिती देण्यात आली, मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली. यावेळी ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या B.Com. आणि M.Com. (लेखा आणि वित्त) विभागातर्फे २ मूल्यवर्धित अभ्यासक्रम १) GST रिटर्न फाईलिंग यात २७ विद्यार्थी सहभाग आणि २) आयकर इ - फायलिंग (ITR आणि TDS)यात १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या समारोप कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ९ मार्च २०२४ रोजी करण्यात आले होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागातर्फे औद्योगिक आणि संस्थात्मक मानसशास्त्र यात करियर दृष्टीने संधी या विषयाबाबत माजी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्यात आला. दिनांक १७ मार्च २०२४ रोजी याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात एकूण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कु. मनवा कुलकर्णी, कु. नेहा गायकवाड, कु. वैष्णवी परांजपे, कु. श्रेया गुप्ता, कु. सानिया मेहतर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या ग्रीन क्लब समितीतर्फे दिनांक २२ मार्च २०२४ रोजी जागतिक जल दिन निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. प्रथमेश मुरकुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानिमित्ताने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. बसेसमधून जलसंधारण बाबत जनजागृती करण्यात आली. एकूण ३२७ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या स्पोर्ट्स सीसी तर्फे चित्रपट स्क्रिनिंग कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २ एप्रिल २४ रोजी करण्यात आले होते. यात एकूण १२४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाचा २०२२-२३ वर्षाचा पदवीदान समारंभ दिनांक ३ आणि ४ एप्रिल २०२४ रोजी पार पडला. जवळपास १००० हून अधिक विद्यार्थी या समारंभास उपस्थित होते.

प्राचार्यांच्या कक्षापासून कात्यायन हॉलपर्यंत मिरवणुकीने समारंभाला सुरुवात झाली. मिरवणुकीच्या वेळी प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक, श्री. राजेंद्र साळवी, सर्ज कोषाध्यक्ष, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. टोकेकर, डॉ. पाटील, समारंभ प्रभारी डॉ. अर्चना प्रभुदेसाई, प्रा. नीतिन पागी, श्री. मुर्डेश्वर, श्री. गोखले, प्रा. नारायण बारसे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. भाषणादरम्यान श्री साळवी सरांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले आणि उच्च शिक्षण, रोजगार आणि तंदुरुस्तीचे महत्त्व यावर भर दिला.

प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी भविष्यात योग्य संधी मिळवण्यावर भर दिला.

विद्या प्रसारक मंडळाची शपथ आदरणीय प्राचार्य (डॉ.) सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना दिली.

वर नमूद केलेल्या अभ्यासक्रमातील प्रथम क्रमांकाच्या (सुवर्ण पदकासह) आणि द्वितीय क्रमांकाच्या (रौप्य पदकासह) सत्काराबरोबरच या वर्षापासून महाविद्यालयाने गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा, विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांकाचा आणि १ला दिव्यांग रँकर यांचा सत्कार करण्यास सुरुवात केली आहे.

SURGE- An Alumni Association of College द्वारे संयुक्तपणे आयोजित केलेल्या पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात श्री. हर्ष भोसले (B.A.) आणि CA महेश कृष्णमूर्ती (B.Com.) श्री.डेनिस नायर (self finance) या गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

'पुणेरी पगडी आणि उपरणे' या पारंपरिक पोशाखात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले होते.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### रसायनशास्त्र विभाग

रसायनशास्त्र विभागातर्फे इंस्ट्रुमेंटेशन आणि स्टँडर्ड सोल्युशनची तयारी ('Instrumentation and preparation of standard solution')आणि नवशिक्यांसाठी बौद्धिक संपदा (Intellectual property rights: for beginners) हक्क हे दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रम फेब्रुवारी २०२४ पासून सुरू करण्यात आले.

रसायनशास्त्र विभाग तृतीय वर्ष विज्ञान शाखा आणि निष्णात अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता १० ते १६ फेब्रुवारी २०२४ रोजी केरळ येथे आद्योगिक भेटीचे आयोजन येथे करण्यात आले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उपयोजित रसायनशास्त्र विभाग, कोचीन विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ, कोचीन, चहा कारखाना,मुन्नार आणि स्पाइस गार्डन, मुन्नार येथे भेट दिली. या औद्योगिक भेटीत एकूण ३६ विद्यार्थी व ४ शिक्षक सहभागी झाले.

एलिमेंट ऑफ ऑक्शन या थीमसह रसायनशास्त्र विभागातर्फे ४ आणि ५ मार्च २०२४ रोजी केमोफिलिक या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध प्रायोगिक मॉडेल्स, केम रांगोळी, केम क्रिकेट, एलिमेंट ऑक्शन, केमो क्रिकेट, मोक्षपत्तम, हीना, म्युझिकल चेअर, केमिकल कॅटॅस्ट्रॉफी, किस मै कितना दम इत्यादी वेगवेगळ्या कार्यक्रमांमधून रसायनशास्त्रातील गमती जमती सादर केल्या. या कार्यक्रमात एकूण ८५ विद्यार्थी, १० शिक्षक आणि ११ शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी ''IUPAC नामांकन आणि मजा'' या विषयावर लघु चित्रपट तयार केला होता आणि या चित्रपटाचे सादरीकरण ४ आणि ५ मार्च २०२४ रोजी आयोजित केमोफिलिक महोत्सवात करण्यात आले.

### पर्यावरण शास्त्र विभाग

३० मार्च २०२४ रोजी पर्यावरण शास्त्र विभागातर्फे नॅशनल सेंटर फॉर नॅनो सायन्सेसला आणि नॅनो टेक्नॉलॉजी, मुंबई विद्यापीठ (NCNNUM), कलिना कॅम्पस ला भेट देण्यात आली, ह्या भेटी मुळे विद्यार्थ्यांना संशोधनाचे ज्ञान तसेच नॅनो तंत्रज्ञान, पर्यावरण नॅनो टेक्नॉलॉजी संशोधन आवश्यक साधनांचे कार्य समजून घेण्यास मदत झाली, यावेळी १२ विद्यार्थी आणि १ शिक्षक उपस्थित होते.




### ग्रंथालय विभाग

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर कला-वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय, बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय आणि डॉ. व्ही. एन. ब्रीम्स या महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे संयुक्त विद्यमाने २ मार्च २०२४ रोजी Koha : An Open Source Library Management Software या विषयावर

एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कोहा या मुक्त संगणक प्रणालीबद्दल अधिक माहिती होण्याकरिता ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विद्यार्थ्यांकरिता विशेषतः या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १२ मार्च २०२४ रोजी मा. यशवंतराव चव्हाण जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. मा. यशवंतराव चव्हाण यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन ग्रंथालय विभागात भरवण्यात आले होते.




दिनांक २३ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये शहीद दिवसानिमित्त ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी शहीद भगत सिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन ग्रंथालय विभागात भरवण्यात आले होते.



## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### विद्यापीठ अनुदान आयोग अर्ज

आमच्या महाविद्यालयाने ५० वर्षे पूर्ण केलेल्या महाविद्यालयांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग च्या ७व्या योजना अंतर्गत निधीसाठी अर्ज केला आहे. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाने २०२१-२०२२ मध्ये ५० वर्षे पूर्ण केली. माहिती तपशील आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह, महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोग च्या रु. २५,००,०००/- च्या अनुदानासाठी अर्ज सादर केला आहे.

### साक्षीदार तपासणी कार्यशाळा

दि. १/३/२०२४ रोजी वि.प्र.मं च्या ठा. म पा. विधी महाविद्यालयाने मूट कोर्ट रूम मध्ये साक्षीदारांच्या तपासणी कार्यशाळेचे आयोजन केले होते. आमच्या विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून कोर्टात नेमके काय होते हे समजावे म्हणून महाविद्यालयाने हा उपक्रम हाती घेतला. न्यायालयासमोरील खटल्यादरम्यान साक्षीदारांची तपासणी कशी केली जाते. तपासाची नोंद न्यायालयात कशी नोंदवली जाते आणि त्यानंतर त्याच साक्षीदाराची उलटतपासणी कशी केली जाते. कोणत्याही खटल्याचा हा सर्वात महत्त्वाचा भाग असतो, मग तो दिवाणी किंवा फौजदारी खटला असो. आमच्या महाविद्यालयात गेल्या दोन-तीन वर्षांपासून हा उपक्रम कार्यरत आहे.

प्रिसाईडींग अधिकाऱ्यांच्या परवानगीने कामकाज सुरू झाले. प्रा.विनोद वाघ यांनी प्रथम शैलेश सतीश लाटकर यांची चौकशी केली जे माहिती व तक्रारदार होते. २ व्यक्तींनी त्याच्याशी संपर्क साधून त्याच्याशी मैत्री कशी केली आणि त्याची २ तोळ्याची सोनसाखळी

आरोपीला देण्यास कसे पटवून दिले आणि त्यांच्या प्रभावाखाली त्याने आपली सोनसाखळी आरोपीला कशी दिली हे त्याने मांडले. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, श्री. संदेश गावंड हे सध्या राबोडी पोलिस ठाण्यात एपीआय आहेत. कार्यशाळेच्या तयारीत त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापक श्री. विनोद वाघ यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले, श्री. अंबर अरुण जोशी यांनी बचाव पक्षाचे वकील म्हणून काम केले आणि श्री संजय भाटे सर जे माजी अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश आहेत आणि आमच्या महाविद्यालयातील व्हिजिटिंग फॅकल्टी यांनी पीठासीन अधिकारी न्यायाधिश म्हणून काम पाहिले.

या कार्यशाळेची रचना तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन करण्यात आली होती परंतु आम्ही प्रथम वर्ष विधी आणि द्वितीय वर्ष विधी विद्यार्थ्यांनाही आमंत्रित केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत मनापासून भाग घेतला. आम्ही आयपीसीच्या कलम ३४ सह कलम ४२० अंतर्गत मालमत्तेसाठी एखाद्या व्यक्तीला फसवणूक आणि अप्रामाणिकपणे प्रवृत्त करण्याचा फौजदारी खटला निवडला. आमच्या महाविद्यालयाचे तृतीय वर्ष विधी चे विद्यार्थी १) शैलेश सतीश लाटकर यांनी फिर्यादीची भूमिका साकारली २) सूरज तुळशीराम कंधाणे यांनी पंच साक्षीदाराची भूमिका केली आणि ३) श्री संदेश रंगनाथ गावंड यांनी तपास अधिकाऱ्याची भूमिका केली. त्यानंतर दुसरा साक्षीदार सूरज तुळशीराम कांधणे तपासण्यात आला. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम केले. त्याच्या मुख्य परीक्षेदरम्यान त्याने सोनसाखळी आरोपींच्या सांगण्यावरून तपास अधिकाऱ्यांनी जप्त केल्याचे स्पष्टपणे सांगितले. मुख्य परीक्षेनंतर त्यांची उलटतपासणीही झाली. एकूणच ही एक अप्रतिम कार्यशाळा होती आणि सर्व विद्यार्थ्यांनी खूप आनंद घेतला आणि आम्हाला खात्री आहे की, त्यांना कायद्याच्या न्यायालयात साक्षीदारांची तपासणी कशी केली जाते याची थोडीशी नक्कीच आली असेल. यावेळी अ‍ॅड. भाटे यांनी तपासणी व उलट तपासणी यांच्या बद्दलचा कायदा व आवश्यक असलेले कौशल्य याची माहिती दिली.

### राज्य स्तरीय मॉडेल इंडियन पार्लमेन्टरी सेशनचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळाचे टीएमसी विधी महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाइन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ मार्च २०२४ रोजी प्रांगणातील पेशवे सभागृहात एक दिवसीय राज्य स्तरीय मॉडेल इंडियन पार्लमेन्टरी सेशन चे आयोजन करण्यात आले होते.

सत्तापक्ष आणि विरोधीपक्षामध्ये विभागलेल्या सुमारे ७० विद्यार्थ्यांनी लोकसभेचे सत्र गाजवले. अधिवक्ता, इंटर्न आणि पॅरालीगल स्वयंसेवीला मारहाण आणि धमकावण्यापासून संरक्षण देण्याच्या विधेयकावर चर्चा झाली. प्रचंड कौशल्य आणि कायद्याचे आकलन आवश्यक असलेल्या विधेयकावर कलमांनुसार चर्चा करन्यात आली. त्याआधी प्रश्नोत्तराचा तास होता, ज्यात सत्ताधाऱ्यांना खडे बोल सुनावण्यात आले. वैवाहिक बलात्कार या विषयावरील प्रश्न लक्षणीय होते. रोटरी क्लबचे डॉ.लकी बसट हे सभापती म्हणून काम बघत होते. ८ वेगवेगळ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या रोमांचक अनुभवात भाग घेतला.

तीन सर्वोत्कृष्ट वादपटू, सर्वोत्कृष्ट प्रश्नांसाठी २, सर्वोत्कृष्ट उत्तरांसाठी २, सर्वोत्कृष्ट पोशाखासाठी २ आणि १ सर्वोत्कृष्ट मंत्री यांना त्यांच्या कामगिरीसाठी पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांना भारतीय संविधानाची प्रतही देण्यात आली. यावेळी दोन स्वतंत्र निरीक्षकांनी निरिक्षण करून निर्णय घेतला. निरीक्षक

श्री संदीप सावंत आणि ॲड कु. क्षितिजा खांगटे यांनी ही जबाबदारी उचलली.

रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाइनचे अध्यक्ष प्रदीप जैन, श्रीमती मृणाल, रोटेरियन आणि इतर रोटेरियन यांनी हे सत्र एक भव्य शिक्षण अनुभव बनवण्यात योगदान दिले. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्राध्यापक श्री. विनोद वाघ यांच्या नेतृत्वाखालील विधी महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या सदर अधिवेशनचे यशस्वी नियोजन आणि अंमलबजावणीसाठी काम केले.



**नवीन फौजदारी कायद्यावरील कार्यशाळा संपन्न**

दिनांक १४ मार्च २०२४ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे टीएमसी विधी महाविद्यालयामध्ये विधी सहाय्य केंद्राद्वारे, एक दिवसीय कार्यशाळा पारित पडली. नवीन फौजदारी कायदा यावर चर्चा करण्यात आली. भारत सरकारने अधिसूचना काढून नवीन फौजदारी कायदे जसे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन कायदे दिनांक १ जुलै २०२४ पासून लागू होणार आहे. या निमित्ताने विधीच्या विद्यार्थ्यांना व सामान्य नागरिकांना ह्या कायद्याविषयी माहीती व्हावी व जनजागृती व्हावी म्हणून सदर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी माजी डीसीपी श्री. नागेश लोहार, वरिष्ठ अधिवक्ता श्री. गजानन चव्हाण यांनी सदर कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले. पाणिनि सभागृहात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मुंबई विद्यापीठा अंतर्गत अशी कार्यशाळा आयोजित करणारे हे पहिलेच महाविद्यालय आहे. यावेळी विद्यार्थी व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार, विधी सहाय्य केंद्रांचे प्रभारी प्रा. विनोद एच वाघ तसेच प्रा. हेतल मिशेरी, प्रा. कृष्णा कामथ, ग्रंथपाल शीतल सोनावणे यांनी सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.





**आचार्य महाविद्यालयाची तपासणी**

प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी १५ मार्च रोजी विद्यापीठ तज्ज्ञ समितीचा भाग म्हणून आचार्य महाविद्यालयाला भेट दिली. आचार्य कॉलेज चेंबूरने नवीन लॉ कॉलेजसाठी प्रस्ताव सादर केला होता आणि विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने पायाभूत सुविधांची पाहणी करून विद्यापीठाला अहवाल द्यायचा होता.

**मुट कोर्ट स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश**

आमच्या महाविद्यालयाने वि.प्र.मं. चे ठा.म.पा. विधी महाविद्यालयाने आंबेडकर कॉलेज ऑफ लॉ, वडाळा यांनी दिनांक १६ मार्च रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत सर्वोत्कृष्ट संशोधक ट्रॉफी जिंकली.

या स्पर्धेत द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्री तुषार वारंग आणि श्री अनिल म्हात्रे यांनी सहभाग घेतला होता.




**महाविद्यालयाचा एल एल एम व एल एल बी अतिरिक्त तुकडी संदर्भात अर्ज**

महाविद्यालयाने विद्यापीठाकडे एल एल एम व एल एल बी अतिरिक्त तुकडी संदर्भात केलेल्या अर्जावर तक्रार निवारणाची सुनावणी संदर्भात सन्माननीय कुलगुरू ह्यांनी बोलावल्याप्रमाणे महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी व्यवस्थापकीय मंडळाचे प्रतिनिधी श्री. रवींद्र रसाळ ह्या दिनांक १८ मार्च २०२४ रोजी विद्यापीठाच्या फोर्ट येथील कार्यालयात उपस्थित होत्या. तत्पूर्वी दिनांक १५ मार्च रोजी प्रभारी प्राचार्यांनी विद्यापीठाच्या पत्राला लेखी उत्तर सादर केले होते. ज्यात महाविद्यालयाला नॅक मान्यता नाही, मान्यताप्राप्त शिक्षक नाहीत आणि नियमित प्राचार्य नाहीत या कारणास्तव परवानगी नाकारल्याची माहिती दिली होती. प्रत्युत्तरात कॉलेजने विद्यापीठाचे लक्ष डिसेंबर २०२३ मध्ये दुसऱ्या सायकल नॅक मान्यतेकडे वेधले. ६ अध्यापक पदे भरण्यासाठी १९ फेब्रुवारी रोजी जाहिरात देण्यात आल्याची माहिती विद्यापीठाला पुरवण्यात आली.

**महाविद्यालय विकास समिती (सीडीसी) आणि IQAC बैठक संपन्न**

१६ मार्च रोजी १५ वी महाविद्यालय विकास समिती (सीडीसी) बैठक झाली. रिअल इस्टेट कायदे आणि कला, थिएटर आणि कायदेशीर साक्षरता मधील सर्टिफिकेट प्रोग्राम्सवरील अहवालांना किमान ५०% विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करावी या अटींवर मान्यता देण्यात आली. सीडीसीने नॅक ग्रेडवर चर्चा केली आणि ‘चांगल्या श्रेणीसाठी कॉलेजच्या कर्मचाऱ्यांची अधिक मेहेनत घेण्याची आवश्यकता आहे’ असे सांगितले. तसेच त्यांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी या समितीचे सर्व सदस्य हजार होते व त्यांनी दिलेल्या अजेंडा वर त्यांचे मत मांडले.

२७ मार्च रोजी प्रथम वर्ष विधीच्या प्रथम सत्रा चा निकाल जाहीर करण्यात आला व द्वितीय वर्ष विधी च्या विद्यार्थ्यांचा चौथ्या सत्रचा निकाल २० मार्च रोजी घोषित करण्यात आला.

**अंतर्गत, मूल्यमापन आणि डी.पी.सी परीक्षा खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पार पडली :**

२०२३-२०२४ - सत्र - II, सत्र - IV, सत्र - VI

| सत्र | तारीख | वेळ | पहिली संधी | अतिरिक्त संधी |
|---|---|---|---|---|
| सत्र - VI | १५/०३/२०२४<br>१६/०३/२०२४ | ५.१५ ते ६.१५ | वैकल्पिक विवाद निराकरण कायदा, पुरावा कायदा आणि पर्यायी विषय | - |
| सत्र - II<br>सत्र - IV | २३/०३/२०२४ | २.०० ते ४.००<br>५.०० ते ७.०० | प्रकल्प आणि वर्ग चाचणी | - |

अज्ञानाची फळे नश्वर असतात; ती सकाळी जन्माला येतात आणि सायंकाळी नष्ट होतात!

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सत्र - VI | ३०/०३/२०२४<br>०६/०४/२०२४ | ५.१५ ते ८.१५ | डी.पी.सी - III | डी.पी.सी - III<br>अतिरिक्त |
| सत्र - VI | ०९/०४/२०२४<br>१०/०४/२०२४ | ५.१५ ते ६.१५ | - | वैकल्पिक विवाद निराकरण कायदा, पुरावा कायदा आणि पर्यायी विषय |
| सत्र - II<br>सत्र - IV | १३/०४/२०२४ | २.०० ते ४.००<br>५.०० ते ७.०० | - | प्रकल्प आणि<br>वर्ग चाचणी |
| सत्र - II<br>सत्र - IV | २०/०४/२०२४ | ५.०० ते ८.०० | डी.पी.सी - I<br>डी.पी.सी - II | |
| सत्र - II<br>सत्र - IV | २९/०४/२०२४ | ५.०० ते ८.०० | - | डी.पी.सी - I<br>डी.पी.सी - II |

**के. सी. विधी महाविद्यालय राष्ट्रीय परिषद**

के. सी. विधी महाविद्यालयाने 'पर्यावरणीय स्थिरता सुसंवाद' ह्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे दिनांक ३० मार्च २०२४ रोजी आयोजन केले होते. सदर परिषदेत महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी उच्च शैक्षणिक संस्थांचे ग्रीन ऑडिट-राष्ट्रीय मूल्यमापन आणि मान्यता परिषद पर्यावरणीय स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी शासनामध्ये पर्यावरणीय विचारांचे एकत्रीकरण करण्यास भाग पाडते (Green - udit of Higher Educational Institutions - The National Assessment and Accreditation Council Nudge to Integrate Ecological Consideration in the governance to Ensure Environmental Sustainability) हा पेपर सादर केला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन, ठाणे यांच्या ''सौर ऊर्जेवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था'' आणि ''स्पेस एक्सप्लोरर'' प्रकल्पांना महर्षी परशुराम यांच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथे प्रथम आणि द्वितीय पारितोषिक मिळाले.

अभियांत्रिकीच्या पदविका विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, तसेच त्यांच्यातील नावीन्यपूर्ण कल्पकतेला चालना मिळून विज्ञानविषयक आविष्कार सादर करण्याची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयच्यावतीने प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञानविषयक आविष्कार सादर करतानाच संशोधनाला चालना देणे हा या स्पर्धेचा मुख्य हेतू होता.

कोकण विभागातील दहा तंत्रनिकेतन मधील एकूण ३४ गटांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन टाटा मूलभूत संशोधन केंद्रातील निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. सुधाकर आगरकर यांच्या हस्ते करण्यात आले. सृजनशीलतेचा विकास हा विकसित भारत निर्मितीमध्ये खूप महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन यावेळी डॉ. आगरकर यांनी केले. या प्रकल्प स्पर्धेत सहभागी प्रकल्प वर्किंग, व्हर्चुअल मेकअप मॉडेल असे होते. इकोफ्रेण्डली, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू साहित्य असेही प्रकल्प सादर झाले. सौरऊर्जेचा नावीन्यपूर्ण उपयोग, शेतीमध्ये वापरात येतील अशी आधुनिक अवजारे, प्लास्टिकचा

पुनर्वापर, निसर्गपूरक घरबांधणी, आर्टीफिसिअल इंटेलिजन्स, भूजल पुनर्भरण, आधुनिक ड्रोन, रोबोट नियंत्रित वाहन, अग्निशमन दलासाठी उपयुक्त रोबोट इ. नावीन्यपूर्ण प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले.

सामाजिक जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रकल्पाची उपयुक्तता, सोपी हाताळणी, नावीन्यपूर्णता, कल्पकता, सादरीकरण अशा निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून भाभा अणुसंशोधन केंद्रातील निवृत्त शास्त्रज्ञ श्री. जयंत कयाल, डॉ. राजेंद्रकुमार कुलकर्णी व श्री. अशोककुमार यादव यांनी काम पाहिले. स्पर्धेनंतर लगेच बक्षीस वितरण समारंभ महाविद्यालयातील नाना फडणवीस सभागृहामध्ये पार पडला. पहिली दोन पारितोषिके विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे यांनी पटकाविले. कु. दीप शहाणे, कु. हर्ष बनसोडे, कु. अनिश परब व कु. श्रद्धा पाटील या गटाच्या ''सौरऊर्जेवरील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था'' या प्रकल्पाने १० हजार रुपये रोख प्रथम पारितोषिक पटकावले. सौ. व्ही.ए. जोशी, HOD इंस्ट्रुमेंटेशन, ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला होता. कु.यश पालकर, कु.ऋषभ वेलके, कु. महेश्वरी पेडणेकर व कु. वैष्णवी अहिरे या गटाच्या 'अंतरिक्ष यात्री' ह्यांच्या प्रकल्पाला ७ हजार रुपये रोख दुसरे पारितोषिक मिळाले. ह्या गटाला सौ. निवेदिता राणे ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

सह्याद्री तंत्रनिकेतन, सावर्डेच्या अश्लेष निवटे व गटाच्या 'मेन्डेज' या प्रकल्पास रोख रुपये ५ हजारचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. यशवंतराव भोसले तंत्रनिकेतन, सावंतवाडीच्या हर्षद चव्हाण व गटाच्या 'भूजल पुनर्भरण' या प्रकल्पाने रोख रुपये २ हजारांचे उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांनी सर्व स्पर्धकांच्या प्रकल्पांचे कौतुक केले.







विद्या प्रसारक मंडळ पॉलिटेक्निक, ठाणे यांच्या PLC Based Jacketed Reactor Control System With IoT प्रकल्पाने नवी मुंबई येथील DIPEX 24 स्पर्धेत दुसरे पारितोषिक जिंकले.

विद्या प्रसारक मंडळ पॉलिटेक्निक ठाणे , यांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या PLC Based Jacketed Reactor Control System With IoT या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी DIPEX 2024 मध्ये इंडस्ट्रियल ऑटोमेशन विभागाअंतर्गत द्वितीय क्रमांक पटकावला, ही राज्यस्तरीय प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा महाराष्ट्र आणि गोव्यातील ITI/डिप्लोमा/ अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/कृषी (विज्ञान) विद्यार्थ्यांसाठी होती.

PLC Based Jacketed Reactor Control System With IoT हा प्रकल्प विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन ठाणे यांच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी श्री. रितेश मा. शिर्के, श्री. स्वप्नील कि. तायवाडे, श्री. प्रथमेश वि. कदम व श्री. दुर्वेश सू. ठाकूर यांनी प्रा. सौ. स्मिता डी. खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.


पारितोषिक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे श्री. चंद्रकांतदादा पाटील (उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग

व संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य आमदार–कोथरूड विधानसभा), प्रमुख उपस्थिती मा. श्री. ए. राजराजन (निर्देशक – सतीश धवन अंतराळ केंद्र श्रीहरी कोटा इस्रो), मा. श्री. मधुसूदन अग्रवाल (उपाध्यक्ष, अजंथा फार्मा), डॉ. विनोद एम. मोहितकर (संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई) श्री. सुरेश हावरे (अध्यक्ष स्वागत समिती, DIPEX 2024), मा. श्री. राणाजगजितसिंह पाटील (आमदार, तुळजापूर विधानसभा मतदारसंघ, महाराष्ट्र), मा. श्री. याज्ञवल्क्य शुक्ल (तशत्रिय महामंत्री, अभाविप), मा. श्रीकांत दुधगीकर (प्रदेश अध्यक्ष, अभाविप, कोकण प्रांत), मा. श्री. रामनाथ म्हात्रे (सचिव स्वागत समिती, DIPEX 2024), श्री. संकल्प फळदेसाई (राज्यमंत्री, अभाविप, कोकण प्रांत), मा. श्री. मल्हार पाटील (विश्वस्त – तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट) आदी मान्यवर उपस्थित होते.

ही स्पर्धा तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, नवी मुंबई, महाराष्ट्र येथे ७ ते १० मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या ४ दिवसांच्या भव्य समारंभात ३५० हून अधिक कार्यरत प्रकल्प, १००० हून अधिक सहभागींसह प्रदर्शित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला उद्योग व्यावसायिक, शैक्षणिक तज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी आणि समाजातील तांत्रिक आणि गैर–तांत्रिक वर्गातील अभ्यागतांनी भेट दिली.

मॉडेलचा वापर : इंडस्ट्रीमध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) लागू करून मॅन्युअल ओव्हरहेड कमी करण्यासाठी तसेच योग्य उपाययोजना करण्यासाठी जबाबदार व्यक्तीला सूचित करण्यासाठी IoT ने आम्हाला वायरलेस उपकरणांचा आणि सेन्सर्स वापर करून शक्तिशाली औद्योगिक प्रणाली आणि अनुप्रयोग तयार करण्याचा एक आशादायक मार्ग दिला आहे. हे डेटा मॉनिटरिंग सिस्टमसाठी RS485 प्रोटोकॉलद्वारे वेब आधारित रिअल टाइम प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर्स (PLC) आणि पर्यवेक्षी नियंत्रण आणि डेटा अधिग्रहण (SCADA) डिझाइन आणि अंमलबजावणी करते. प्रकल्पाचे मुख्य योगदान हे आहे की IoT च्या वापरामुळे उद्योगांमध्ये सुरक्षिततेसह निरीक्षण आणि नियंत्रण करू शकतो.





**वार्षिक बक्षीस वितरण समारंभ**

दिनांक ३० मार्च २०२४ रोजी पाणिनी सभागृहात ९ वाजता बक्षीस वितरण समारंभ पार पडला. सदर कार्यक्रमाला विद्या प्रसारक मंडळाचे सभासद श्री. अनिरुद्ध जोशी हे प्रमुख पाहुणे होते. व्ही.जे.टी.आय मधून 'Civil Engineering' ची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी आपली कारकीर्द संगीतात फुलविली. त्यांनी आपल्या खुमासदार शैलीने उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच १००% विद्यार्थी उत्तीर्ण झालेल्या विषयात त्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी अनेक विविध स्पर्धेत उत्तुंग यश प्रदान केले. त्या विद्यार्थ्यांचा पण या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुबद्ध नियोजनाने हा सत्कार समारंभ उत्तम रीतीने पार पडला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

१ मार्च : एम एम एस २०२३-२५ तुकडीच्या प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सरिता गुप्ते हिने पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या पी टी व्ही ए इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट-विलेपार्ले येथे युवर वर्ड मॅटर्स या वादविवाद स्पर्धेमध्ये द्वितीय उपविजेते पद पटकावले.

२ मार्च : 'कोहा एक दिवसीय कार्यशाळा'

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था येथे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (एम. लिब.)च्या विद्यार्थ्यांसाठी कोहा (Open Source Library Management) ग्रंथालय संगणक या प्रणालीवर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. सदरहू कार्यशाळा जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे यांच्या सहकार्याने आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये जोशी बेडेकर महाविद्यालयाचे एमलिबचे विद्यार्थी, मुंबई विद्यापीठामधील एमलिबचे विद्यार्थी, तसेच YCMOU एमलिबचे विद्यार्थी उपस्थित होते. या एक दिवसाच्या कार्यशाळेमध्ये कोहाची एकंदरीत पार्श्वभूमी, कोहाचा विकास कसा होत गेला आणि विद्या प्रसारक मंडळाने कोहा कधी पासून वापरण्यास सुरुवात केली या बद्दल मार्गदर्शन सकाळच्या सत्रामध्ये श्री नारायण बारसे ग्रंथपाल, जोशी बेडेकर महाविद्यालय ठाणे यांनी केले. तसेच त्यानंतर कोहा या ग्रंथालय संगणक प्रणालीवर सविस्तर माहिती श्री संजय सपकाळ ग्रंथपाल डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे यांनी दिली. यामध्ये कोहातील विविध विभाग म्हणजेच Cataloging, Circulation, Patron, Serials (Journals and Periodicals), Reports, Koha -dministration या विविध विभागाची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि त्यांच्या कडून प्रात्यक्षिक करून घेतले. यासाठी ग्रंथालयातील सेवक वर्ग सौ. दीपाली हिंदळेकर, श्री. स्वप्नील पवार, सौ.प्रज्ञा मोहिते, श्री. प्रमोद सावंत यांनी विद्यार्थ्यांना कोहाचे प्रात्यक्षिक घेण्यासाठी मदत केली. तसेच सौ. कादंबरी मांजरेकर ग्रंथापाल, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांनी ग्रंथालयांचे कोहा मधून वेब पेज म्हणजे OPAC या संदर्भात सविस्तर माहिती सांगितली. सदरहू या कार्यशाळेस विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जोशी बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयच्या प्राचार्या सौ. विंदा मांजरमकर, तसेच सौ. प्रियवंदा जोशी या प्रसंगी उपस्थित होत्या. या सर्वांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या.






२ मार्च : एन्थुझिया ४.०/Enthusia 4.0

ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे वार्षिक मॅनेजमेंट फेस्ट, Enthusia 4.0 चे आयोजन करण्यात आले. विविध क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यवस्थापन खेळांचा समावेश असलेल्या या आंतर-महाविद्यालयीन महोत्सवा मध्ये मुंबई आणि आसपासच्या विविध संस्थांच्या सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग

घेतला. क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यवस्थापन खेळांच्या श्रेणींमध्ये एकूण १० स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

सकारात्मक स्पर्धात्मकतेद्वारे सहकार्याला प्रोत्साहन देणे, व सर्जनशीलता, संवाद कौशल्य, विश्लेषण कौशल्य, अशी विविध कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या महोत्सवाला सहभागी सर्वच विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे परिपूर्ण योगदान देऊन महोत्सवाचा आनंद घेतला.







७ मार्च : एम एम एस २०२३ - २५ तुकडीच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनी; सिद्धी प्रसाद खटावकर, झोया झुले आणि वैष्णवी डोलनार, यांनी वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (वि स्कूल) आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ब्रँडस्प्रिंट त्रयी या स्पर्धेत द्वितीय उपविजेते पद पटकावले.

८ मार्च: ब्रिम्सच्या महिला विकास समितीनतर्फे, केतकी मिस्त्री आणि श्वेता नायर यांनी विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण या विषयावर श्री. खेमराज यांच्या एका सत्राचे आयोजन केले. तसेच महिला दिनानिमित्त महिला प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांसाठी एक छोटेखानी कार्यक्रमही आयोजित करण्यात आला.




९ मार्च : कांदिवली येथील निर्मला मेमोरियल फाऊंडेशन कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्सच्या (IQAC) द्वारे आयोजित आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (ICSSR) द्वारे प्रायोजित प्लॅनींग, डिझाईनिंग अँड डेव्हलपिंग ऑफ डिजिटल लायब्ररीस अँड डिजिटल प्रिसर्वेशन या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रासाठी, ब्रिम्सचे ग्रंथपाल श्री संजय सपकाळ यांना व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी नेव्हिगेटिंग थ्रू डिजिटल लायब्ररी अँड क्रिऍटिंग या डिजिटल रिपॉझिटरी या विषयावर व्याख्यान दिले.




१६ मार्च : राष्ट्रीय परिषद : स्ट्रेंथनिंग द सोशल एंटरप्रेन्युरियल इकोसिस्टम थ्रू इनोव्हेशन, सस्टेनेबिलिटी अँड मॅनेजमेंट स्ट्रॅटेजीज

डॉ. व्ही.एन. ब्रिम्स (BRIMS) तर्फे व इंडियन कौन्सिल ऑफ सोशाल सायन्स रिसर्च, पश्चिम विभागाच्या सौजन्याने शनिवार दिनांक १६ मार्च २०२४ रोजी स्ट्रेंथनिंग द सोशल एंटरप्रेन्युरियल इकोसिस्टम थ्रू

झाडासारखे जगा खूप उंच व्हा! पण जीवन देणाऱ्या मातीला विसरू नका!

इनोव्हेशन, सस्टेनेबिलिटी अँड मॅनेजमेंट स्ट्रॅटेजीज या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक उद्योजकता ही संकल्पना अलीकडे भारतात आणि जगभरात खूप लोकप्रिय झाली आहे. सामाजिक सेवा आणि उद्योजकता या दोहोंचा उत्तम मिलाप असलेल्या या संकल्पनेमुळे उद्योजकतेची भावना पूर्णत: जगताना समाजाला अधिक अर्थपूर्ण रीतीने सेवा देण्यास मदत होते. म्हणूनच अशा या महत्त्वपूर्ण विषयावर विचारमंथन करण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेची सुरुवात ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. ब्रिम्सचे महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी परिषदेच्या विषय सूत्रा संदर्भात माहिती दिली.

या परिषदेसाठी माजी राज्यसभा सदस्य व रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (आरएमपी) चे उपाध्यक्ष, डॉ. विनय सहस्रबुद्धे प्रमुख अतिथी अतिथी, तसेच निर्वाणा फार्म्स, ग्रो अर्बन निर्वाणा सोल्युशन्स प्रा. लि. च्या संस्थापिका श्रीमती रेणुका साळवी यांना सन्माननीय अतिथी वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

वात्सल्य फाऊंडेशनच्या सचिव व सखी प्रकल्पाच्या संस्थापिका, श्रीमती स्वाती बेडेकर यांनी परिषदेच्या विषयसूत्रा नुसार महत्त्वाचे असे मुख्य भाषण सादर केले.

त्यानंतर झालेल्या परिसंवादामध्ये मध्ये डॉ.(मा.) नयन भेडा, डॉ. राधा अय्यर, श्री. अजिताभ दत्ता या उद्योग क्षेत्रातील जाणकारांनी सामाजिक उद्योजकता या विषयावर आपले विचार व्यक्त केले. ब्रिम्सचे सहा. प्रा. प्रथमेश तावडे यांनी परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.

परिषदेच्या समन्वयक डॉ. स्मिता जपे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने सकाळच्या सत्राची सांगता झाली.

परिषदेच्या उत्तरार्धात शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. डॉ ब्रिजेश आर शर्मा आणि प्रा. कला महादेवन यांनी परीक्षण केले.

संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन पदक-प्रमाणपत्र वितरणा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



१७ मार्च : ब्रिम्सचे ग्रंथपाल श्री संजय सपकाळ यांनी, बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या यशवंतराव चव्हाण म्हाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या २०२३-२०२४ च्या बॅचचे ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी (M.Lib.) यांना Information and Library Network (INFLIBNET) Gandhinagar, UGC पुरस्कृत Software for University Libraries (SOUL) या ग्रंथालय संगणक आज्ञावलीची विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त ग्रंथालय आज्ञावली कोहा (KOHA : Open Source Library Management System) या विषयी कोहा मधील सर्व विभागांची सविस्तर माहिती दिली. बाजारात उपलब्ध असणारी कोणतीही संगणक आज्ञावली ग्रंथालयात वापरण्यास सुरुवात केली जाते तेव्हा सर्व आज्ञावली मध्ये काम करण्याची पद्धत ही सारखीच असते. ग्रंथालयात आलेल्या नवीन पुस्तकांची नोंदणी (Cataloging), पुस्तकांची देवाण घेवाण (Circulation), विषयानुसार बजटची मांडणी (Acquisition), सभासदांची नोंदणी (Patrons), जर्नल्स आणि मॅगझिन्स (Journals and Periodicals, Magazines) यांची नोंदणी, ग्रंथालयास दैनंदिन काम करत असताना लागणारे वेगवेगळे अहवाल (Report), पुस्तकाना लावले जाणारे बारकोड (Barcode Tools)

भित्री माणसे मरण्यापूर्वी अनेकदा मरतात;
पण शूर माणसे एकदाच जन्मतात आणि एकदाच मरतात!

अशा विविध विभागांची ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रात येऊ घातलेल्या नव तरुण विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना कोहा या आज्ञावलीची माहिती सांगून त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करून घेतले. तसेच या सर्व विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यांना असणाऱ्या शंका यांचे समाधान करून देण्याचा प्रयत्न केला. कोहा ही आज्ञावली ग्रंथालयात वापरण्यास कशी सोपी आणि उपयुक्त आहे त्याचे फायदे आणि इतर कमर्शियल सॉफ्टवेअर यांच्यातील फरक काय आहे हे समजून सांगितले.



१९ मार्च : के.जी. जोशी आणि बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स तर्फे निधी अनुदानीत संशोधन प्रकल्प निवडण्यासाठी डॉ. स्मिता जपे यांना सल्लागार म्हणून आमंत्रित करण्यात आले.



२० मार्च : डॉ. कांचन आणि प्रा. सिद्धेश यांना जी एन व्ही एस. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे एमएमएस च्या विद्यार्थ्यांसाठी सायकोमेट्रिक चाचणीवर आधारित हाऊ 'टू चूस युवर स्पेशिअलायझशन' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.



२३ मार्च : ठाणे व्यवस्थापन मंचातर्फे 'आरोहणम', या महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ठाण्यातील आघाडीच्या १० महिला नेत्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या सहयोगी प्रा. डॉ. स्मिता जपे, तसेच सहा. प्रा. डॉ. पल्लवी चंदवास्कर यांचा त्यांच्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला.



२८ आणि २९ मार्च : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स ग्रंथालयातर्फे मासिक पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. इनोव्हेशन, क्रिएटिव्हिटी आणि स्टार्ट-अप या विषयसूत्रावर आधारित यावेळच्या प्रदर्शनाचे उद्घाटन ब्रिम्स च्या ई-सेल विभागाचे प्रमुख आणि आयआयसी सदस्य डॉ. पंकज नांदूरकर यांच्या हस्ते झाले.



३० मार्च : सहा. प्रा. प्रथमेश यू. तावडे यांनी एम आय टी कडून डेटा अँड डीसरप्शन : मास्टरिंग मशीन लर्निंग अँड एआय फॉर फायनान्स या विषयावर एक अध्ययन मालिका पूर्ण केली.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.